# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### नाशिक जिल्हयातील वैतरणा धरणाचे सुशोभिकरण करण्याबाबत

**(१) ४६५५ (१०-०४-२०२०). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) नाशिक जिल्हयातील वैतरणा धरण परिसराला नैसर्गिक सौंदर्य लाभले असून या परिसरात डोंगररांगा, जंगल आदी नैसर्गिक धनसंपदा लाभलेली आहे, परंतु याठिकाणी अपेक्षित सुधारणा झाली नसल्याने व आवश्यक त्या सोयीसुविधा, प्रसाधनगृह, पर्यटनाचे दिशादर्शक फलक उपलब्ध नसल्यामुळे पर्यटकांच्या संख्येत घट होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने वैतरणा तलावाचे सुशोभिकरण करणे तसेच उपयुक्त सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

वैतरणा धरण परिसर सुशोभीकरण करणे व पर्यटकांना मुलभूत सोयी सुविधा निर्माण करणेकरिता शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाने रू.३०६ लक्ष किंमतीच्या कामांना दि.०९.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली असून त्या अनुषंगाने पर्यटन विभाग व जलसंपदा विभाग यांच्या समन्वयाने पुढील आवश्यक कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

वैतरणा धरण जलाशयातून बृहन्मुंबई महानगरपालिकेस पाणी पुरवठा करण्यात येत असून त्या प्रकल्पातून जलविद्युत निर्मिती पण करण्यात येत आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पर्यटकांना सदरचे क्षेत्र निषिध्द ठेवण्यात आले आहे व त्यासाठी आवश्यक सूचना फलक लावण्यात आले आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

### मुंबई शहरातील सर्व सामान्य लोकांना परवडणाऱ्या घर खरेदी बाबत

**(२) ३२८१२ (११-०१-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशाची आर्थिक राजधानी मुंबई शहरातील सर्वसामान्यांना परवडणारे घर खरेदी करता यावे याकरीता म्हाडाच्या मुंबई मंडळाने पुढील ५ वर्षात किती घरे बांधून पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे,

(२) असल्यास, उक्त घरे मुंबई शहर व उपनगरात कोणत्या ठिकाणी बांधण्याचा आराखडा म्हाडाच्या मुंबई मंडळाने तयार केला आहे व या आराखड्यास शासनाने मंजूरी दिली आहे काय,

(३) असल्यास या आराखड्यास मंजूरी मिळालेली नसल्यास वा मंजूरी मिळाल्याच्या अनुषंगाने घरे बांधण्याच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०४-१०-२०२३) :**(१) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने विविध उत्पन्न गटांतर्गत पुढील ५ वर्षांत अंदाजे १४,६८१ घरे बांधण्याचे नियोजित केले आहे.
(२) व (३) मुंबई मंडळाने उक्त उद्दीष्ट पुर्ततेसाठी नियोजित केलेल्या गृहनिर्माण योजना मुंबई शहर व उपनगरातील महावीरनगर कांदिवली, जुने मागाठाणे बोरीवली, उन्नतनगर गोरगाव, पहाडी गोरेगाव, सिध्दार्थ नगर गोरेगाव, कोलेकल्याण सांताक्रुझ, ओशिवरा जोगेश्वरी, कन्नमवारनगर विक्रोळी, टिळकनगर चेंबूर, कोपरी पवई, ॲन्टाप हिल वडाळा, सायन प्रतिक्षानगर, कफ परेड कुलाबा, बी.डी.डी. चाळ (वरळी, ना.म. जोशी मार्ग व नायगांव) इत्यादी ठिकाणी आहेत.

यापैकी सद्य:स्थितीत पहाडी गोरेगाव, कोपरी पवई, कफ परेड कुलाबा, ॲन्टाप हिल वडाळा, कन्नमवारनगर विक्रोळी, बी.डी.डी. चाळ (वरळी, ना.म. जोशी मार्ग व नायगांव) इत्यादी ठिकाणच्या योजना प्रगतीपथावर असून इतर योजनांकरीता नकाशे व अंदाज पत्रके तयार करणे, प्रशासकीय मान्यता देणे, तांत्रिक मान्यता देणे तसेच निविदा प्रकिया राबविण्याची कार्यवाही म्हाडाच्या स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळातर्फे पुनर्विकास करणेबाबत**

**(३) ३५६४७ (११-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील पंतप्रधान अनुदान प्रकल्पात (पीएमजीपी)च्या ६६ पैकी ८ वसाहतींचा म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने पुनर्विकास करण्याचा निर्णय दि.१० ऑगस्ट, २०२१ रोजी घेतला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ८ वसाहतींचा पुनर्विकास करण्याकरिता यातील आर्थिक अडचणी दूर करुन प्रकल्पाचे काम मार्गी लावण्यासाठी अद्याप शासन तथा म्हाडातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) तसेच, उक्त पुनर्विकास प्रकल्पाचे काम सुरु होऊन किती कालावधीत म्हाडाकडून पूर्ण होणे अपेक्षित आहे? तसेच उर्वरित ५८ वसाहतींचे पुनर्विकासाचे काम निधी उभारून किती निश्चित कालावधीत पूर्ण करण्याचे शासनाने नियोजन केले आहे,
(४) अद्याप, याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, त्याची विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (२०-०९-२०२३) :**(१) पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतीतील भाडेकरु / रहिवाश्यांच्या संघटनेने केलेल्या मागणीनुसार, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या एकूण ६६ इमारतींपैकी २० इमारतींसह ११ पुनर्रचित इमारती, ०४ भूसंपादित इमारती व ०१ उपकरप्राप्त इमारत मिळून एकूण ०६ समूह पुनर्विकास योजना विकास नियंत्रण नियामवली ३३(९) मधील तरतुदीनुसार प्रायोगिक तत्वावर राबविण्यास व प्रकल्पास मंजूरी प्राप्त करण्याकरिता उच्चाधिकार समितीपुढे सादर करण्यास प्राधिकरणाने दि.११.०७.२०१७ रोजीच्या ठरावानुसार मंजूरी दिलेली आहे.
(२) नगर विकास विभागाने दि. ०८.०७.२०२१ रोजीच्या अधिसूचनेव्दारे विकास नियंत्रण नियमावली ३३(७) व ३३(९) मध्ये सुधारणा मंजूर केल्या असून, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतींचा पुनर्विकास योजनांमध्ये समावेश करण्याची तरतूद केली आहे. या तरतुदीनुसार पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतीतील भाडेकरु / रहिवाशी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करु शकतात. तथापि, कोणत्याही इमारतीतील भाडेकरु / रहिवाश्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेने पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर केलेला नाही.

भाडेकरु / रहिवाशी व त्यांच्या संघटनांनी केलेल्या मागणी तसेच सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(९) मधील तरतुदीनुसार ६ समूह पुनर्विकास योजनांचे व्यवहार्यता तपासणी पुन्हा करण्यात येत आहे.
(३) पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या एकूण ६६ इमारतींपैकी उर्वरित ४६ इमारतींचा पुनविकास विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत भाडेकरु / रहिवाश्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांनी पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर केल्यास, म्हाडातर्फे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेली प्रभादेवी, मुंबई, येथील सुखशांती ही इमारत निकृष्ट दर्जाची असल्याबाबत**

**(४) ३८८३४ (१८-०४-२०२२). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रभादेवी, मुंबई, येथील सुखशांती ही इमारत अतिशय धोकादायक स्थितीत असून सन १९७०-८० वा त्या दरम्यान पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेली असून निकृष्ट दर्जाची आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रचलित नियमात बसत नसल्याने या, इमारतीसाठी निधी उपलब्ध नसल्याने म्हाडा, किवा अन्य कोणत्याही शासन यंत्रणेकडून या इमारतीची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी केली जात नाही हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, विकास नियंत्रण नियमावली ३३ (१०) सारखा स्वतंत्र नियम करून या व अशा इमारतींचा पुनर्विकास होण्यासाठी शासनाकडून निर्णय घेतला जाणार आहे काय व दुरुस्तीसाठी शासनाकडून किती निधी उपलब्ध करून देण्यात येईल व सदर कामासाठी किती कालावधी लागणार आहे,

(४) उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे व नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०६-१०-२०२३) :**(१), (२) व (३)

प्रभादेवी मुंबई येथील सुखशांती ही इमारत सन १९९३-९४ च्या दरम्यान मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत बांधलेली असून, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेली नाही. सदर इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिसून येत नाही. सद्य:स्थितीत इमारतीला दुरुस्तीची आवश्यकता असल्याने दि.११.०७.२०२३ रोजी मे.जगन्नाथ मजुर सहकारी संस्था मर्यादित या कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत कंत्राटदाराकडून इमारत सुखशांती अ व ब करीता अनुक्रमे रुपये २२,५९,०८२/- व रुपये २४,२८,२४८/- असून पावसाळा नंतर इमारतीच्या बाह्य दुरुस्तीचे तसेच इमारतींच्या गच्चीवरील जलरोधकाचे काम हाती घेण्यात येईल. या दोन्ही इमारतींच्या दुरुस्तीकरीता अठरा महिन्यांचा कालावधी विहित करण्यात आलेला आहे.

नगर विकास विभाग दि.१९.१२.२०२२ रोजीच्या अधिसूचनेनुसार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने पुनर्रचित केलेल्या इमारतींचा पुनर्विकास विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) अंतर्गत करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कन्नमवार नगर(विक्रोळी,मुंबई) येथील महात्मा फुले रूग्णालय इमारतीच्या पुनर्विकासाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

**(५) ३९९५५ (१०-०४-२०२२). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी (पुर्व) (मुंबई) येथील कन्नमवार नगर बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या क्रांतीवीर महात्मा फुले रूग्णालय इमारतीच्या पुनर्विकासाठी ना हरकत प्रमाण पत्र देण्याचा प्रस्ताव म्हाडा प्राधिकरणाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त रूग्णालय इमारतीच्या पुनर्विकासाठी ना हरकत प्रमाणप्रत तातडीने देण्याबाबत काय कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे.

(३) असल्यास, नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी किती कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-१०-२०२३) :**(१), (२) व (३)

कन्नमवारनगर विक्रोळी येथील म्हाडा अभिन्यासातील ९५६०.२९ चौ.मी. च्या भूखंडावर महात्मा फुले रूग्णालयाची इमारत बांधण्याकरिता मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून दि.२०.०६.२०२३ च्या पत्रान्वये ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरात पंतप्रधान आवास योजनेमध्ये (पीएमएवाय) विक्री घटकातील घरे गिरणी कामगारांना देण्याबाबत**

**(६) ४५०९३ (२०-०९-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरात पंतप्रधान आवास योजनेमधील (पीएमएवाय) विक्री घटकातील किती घरे गिरणी कामगारांना देण्याचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आहे,

(२) असल्यास, उक्त योजनेतील घरे महागडी असून गिरणी कामगारांना परवडणारी नसल्याने गिरणी कामगारांनी विरोध केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेतील घरांच्या किमती गिरणी कामगारांना वाजवी दरात देण्याच्या अनुषंगाने काय निर्णय घेण्यात आला आहे तसेच याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०९-१०-२०२३) :** (१) नाही.

तथापि, दिनांक १९.०५.२०२२ रोजी तत्कालीन मा. मंत्री गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मुंबई महानगर क्षेत्रामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करून देणे शक्य आहे किंवा कसे ? याची पडताळणी करण्याचे ठरले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) गिरणी कामगारांच्या प्रतिनिधींनी मुंबई महानगर क्षेत्रामधील प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रकल्पांना भेटी देऊन शिरढोण, कल्याण, खोणी कल्याण, अजान होम्स शेलू आणि सुरक्षा स्मार्ट सिटी वसई येथील सदनिकांना पसंती दर्शविली आहे.

सदर घरे वाजवी दरात देणेबाबत अद्यापही असा कोणताही प्रस्ताव प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाई (ता.वाई, जि.सातारा) येथील उजवा/डावा कालव्यासाठी संपादीत झालेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(७) ४८९३७ (१२-१०-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाई (ता.वाई, जि.सातारा) येथील उजवा/डावा कालव्यासाठी संपादीत झालेल्या जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, धोम कलवडी प्रकल्प विभाग, वाई यांना दिनांक ०३/१०/२०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) धोम बलकवडी प्रकल्प वाई, जि. सातारा या प्रकल्पांसंदर्भात मा. विधानसभा सदस्य यांनी दि.०३.१०.२०२१ रोजीच्या पत्रात नमूद ७ शेतकऱ्यांच्या जमीनीचा मोबदला मिळण्याबाबत दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही पुढीलप्रमाणे आहे:-

१) श्री. जयवंत तुकाराम थोपटे व इतर, मौजे खानापूर, ता. भोर, जि. पुणे यांच्या गटांचा भूसंपादन प्रस्ताव दि.९.११.२०२१ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना सादर केला आहे. सदर प्रस्ताव उप जिल्हाधिकारी भुसंपादन क्र.२६, पुणे यांचेमार्फत नगर रचनाकार, पुणे यांना मुल्यांकन तक्त्यामधील हेक्टरी दर तपासणीकरीता पाठविण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतिपथावर आहे.

२) श्री. जगन्नाथ मंडू घोरपडे, मौजे आंबवडे, ता.भोर, जि.पुणे यांच्या संपादीत गटांच्या संयुक्त मोजणीतील त्रुटी दूर करून सुधारीत संयुक्त मोजणीपत्रक भुमी अभिलेख, भोर यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे क्षेत्रीय स्तरावर नियोजित आहे.

३) श्री. अंकुश बाळू घोलप व इतर १२, मौजे सांगवी तर्फे भोर, जि. पुणे यांच्या भूसंपादन प्रस्तावावर संयुक्त मोजणीत त्रुटी आढळल्याने फेर संयुक्त मोजणी प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे.

४) श्री. माणिकराव माधवराव जेधे, मौजे आंबवडे, ता. भोर, जि. पुणे यांच्या भूसंपादन संदर्भात भूमि अभिलेख विभागाकडून वनझाडे व फळझाडांच्या नोंदीसाठी संयुक्त मोजणी करण्याचे काम सुरू आहे. त्यांचेकडून पुर्णांकित संयुक्त मोजणीपत्रक प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे क्षेत्रीय स्तरावर नियोजित आहे.

५) श्री. मारूती राघू बर्डे, मौजे म्हाकोशी, ता.भोर, जि. पुणे यांचा भूसंपादन प्रस्ताव खाजगी वाटाघाटीने व थेट खरेदीने मंजूर झाला आहे. जिल्हाधिकारी, पुणे यांनी दर निश्चिती बैठकीत निश्चित केलेले दर म्हाकोशी येथील खातेदारांना मान्य नसल्याने त्यांना जमिनीचा मोबदला अदा करता आलेला नाही. तसेच मौजे म्हाकोशी गट क्र.२२० मध्ये झाडे व ताली यांची नोंद नसल्याने प्रस्तावात समोवश केलेला नाही.

६) सरपंच, ग्रामपंचायत म्हाकोशी, ता. भोर, जि.पुणे- जिल्हाधिकारी, पुणे यांनी दर निश्चिती बैठकीत निश्चित केलेले दर म्हाकोशी येथील खातेदारांना मान्य नसल्याने त्यांना जमिनीचा मोबदला अदा करता आलेला नाही. संयुक्त मोजणी प्रमाणे ७/१२ उताऱ्यावर ज्या खातेदारांची नावे नमुद आहेत त्यांनाच नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर करण्यात येत आहे.

७) श्री. बाजीराव बळवंत नवघणे, मौजे टिटेघर, ता. भोर, जि. पुणे यांच्या मौजे वडतुंबी येथील संपादित गटांचा उप जिल्हाधिकारी (भुसंपादन) क्र. २६, पुणे यांनी जाहीर निवाडा केला असून अदायगीबाबत उप जिल्हाधिकारी (भुसंपादन) क्र.२६, पुणे कार्यालयास क्षत्रीय कार्यालयाने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रधानमंत्री आवास योजना - शहरी (बीएलसी) योजना राबविण्यात 'पुणे मेट्रोपॉलिटन रिजन डेव्हलपमेंट अथॉरिटी' द्वारे विलंब होत असल्याबाबत

**(८) ४९४२३ (१०-११-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'पुणे मेट्रोपॉलिटन रिजन डेव्हलपमेंट अथॉरिटी' द्वारे प्रधान मंत्री आवास योजना - शहरी (बीएलसी) अंतर्गत घरकुलासाठी सुमारे २ लक्ष ६७ हजार रुपये अनुदान देण्यात येते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'पुणे मेट्रोपॉलिटन रिजन डेव्हलपमेंट अथॉरिटी' द्वारे सन २०२२ मध्ये प्रधान मंत्री आवास योजना- शहरी (बीएलसी) अंतर्गत किती घरकुलांचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे,

(३) असल्यास, सदर योजना सुरु झाल्यापासून राज्य शासन व केंद्र शासन अनुदान वर्गवारी सह किती लाभार्थ्यांचे अनुदान अदा करण्यात आले आहे,

(४) असल्यास, प्रधान मंत्री आवास योजना- शहरी (बीएलसी) योजना राबविण्यात 'पुणे मेट्रोपॉलिटन रिजन डेव्हलपमेंट अथॉरिटी' द्वारे विलंब होत असल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय ,

(५) असल्यास, सदर योजना तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :** (१) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत बीएलसी घटकांसाठी केंद्र हिस्सा रुपये १.५० लक्ष व राज्य हिस्सा रुपये १ लक्ष असे एकूण रुपये २.५० लक्ष प्रति लाभार्थी इतके अनुदान अनुज्ञेय आहे.
(२) पुणे महानगर विकास प्राधिकरण अंतर्गत केंद्रीय मान्यता व संनियत्रंण समितीद्वारे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत ९ तालुक्यातील एकूण २२ बीएलसी प्रकल्पांना मंजूरी दिली असून, लाभार्थ्यांची एकूण संख्या १९११२ इतकी आहे.
(३) व (४) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत १९११२ लाभार्थ्यांच्या प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी रुपये ९८.३३ कोटी व केंद्र शासनाच्या हिश्श्यापोटी रुपये ५४.८४६ कोटी असा एकूण रुपये १५३.१७६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडून लाभार्थ्यांना बांधकामाच्या विविध टप्प्यानुसार केंद्र शासन/राज्य शासनाचा अनुदान निधी नियमानुसार वितरीत करण्यात येतो.
(५) व (६) सदर योजना तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनातर्फे वेळोवेळी आढावा बैठका घेण्यात आल्या आहेत. तसेच बीएलसी घटकातील लाभार्थ्यांना राज्य शासनाचा हिस्सा रुपये १.०० लक्ष ३ टप्प्यात न देता (४० : ४०: २०) सरसकट एकरकमी देण्याबाबत चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

---

## चंद्रपूर जिल्हयात प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या अडचणीबाबत

**(९) ४९५२० (१८-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्याअंतर्गत सन २०१६ पासून प्रधानमंत्री आवास योजना सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेअंतर्गत घरकुल मिळण्याबाबत तेथील २६,०१८ नागरिकांनी अर्ज केले असून माहे जुलै, २०२२ पर्यंत फक्त ३२२ नागरिकांचे घरकुल मंजूर झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेसाठी शासनाने ४ DPR मंजूर केलेले असून त्यात ४०७ DPR व ३.३६६ DPR व १९२ DPR मंजूर करण्यांत आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या DPR पैंकी २८६ DPR व ३६६ DPR मध्ये फक्त प्रथम हप्ता केंद्राने दिलेला आहे व १९२ घरकुलांचा DPR मध्ये अजूनही केंद्र शासनाने निधी मंजूर केलेला नाही, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी निधी मंजूर न करण्याची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०८-०९-२०२३) :** (१) होय.
"सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे" हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टिने चंदपूर शहर महानगरपालिका अंतर्गत २०१६ पासून प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) राबविण्यात येत आहे.
(२) व (३) प्रधानमंत्री अवास योजनेच्या (शहरी) घटक क्र. ४ (Beneficiary Led Construction or Enhancement) अंतर्गत एकूण १४,६८१ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १२५१ अर्ज DPR मध्ये समाविष्ट असून ३५१ नागरकिांच्या घरकुलाची कामे सुरू आहेत.
तसेच केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समिती (CSMC) मार्फत दिनाक ३०/५/२०१८ अन्वये ४०७, दिनांक २३/०८/२०१८ अन्वये २८६, दिनांक ३०/१०/२०१८ अन्वये ३६६ व दिनांक ३०/०३/२०२२ अन्वये १९२ घरकुलांना मंजूरी प्राप्त झालेली आहे.

(४) व (५) २८६ घरकुलांच्या DPR करिता राज्यशासनाचा रुपये ११४.४ लक्ष व केंद्र शासनाचा पहिला हफ्ता रुपये १७०.४० लक्ष असे एकूण २८४.८० लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

तसेच ३६६ DPR करिता राज्य शासनाचा रुपये १४६.४० लक्ष व केंद्र शासनाचा पहिला हफ्ता रुपये १८३.०० लक्ष असे मिळून एकूण रुपये ३३९.४० निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

तथापि, ४०७ घरकुलांच्या DPR करिता राज्य शासनाचा निधी रुपये ४०७.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच १९२ घरकुलांच्या DPR करिता राज्य शासनाचा रुपये १७७ लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला असून केंद्र शासनाचा निधी अप्राप्त आहे, केंद्र शासनाचा निधी प्राप्त झाल्यानंतर वितरणाची तजवीज आहे.

---

**मालेगांव (जि.नाशिक ) येथे पवारवाडी व मालेगाव म्हाळदे व मनमाड चौफुली (चंदनपूरी ) नावाने दोन स्वतंत्र पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्याबाबत**

**(१०) ५०२३२ (०९-०३-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक ) शहरातील वाढता विस्तार व वाढती गुन्हेगारी लक्षात घेऊन पवारवाडी व मालेगाव तालुका या दोन पोलीस ठाण्यांचे विभाजन करुन नव्याने म्हाळदे व मनमाड चौफुली (चंदनपूरी ) नावाने दोन स्वतंत्र पोलीस ठाण्यांच्या निर्मितीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावावर कधीपर्यत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०२३) :**(१) नाही याबाबतचा प्रस्ताव अद्याप पोलीस महासंचालक कार्यालयाकडून शासन स्तरावर प्राप्त झालेला नाही. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार तपासून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू, (जि. पालघर) येथे मच्छिमारांना पाकीस्तान मेरीटाईम सिक्युरिटी एजन्सीने अटक केल्याबाबत**

**(११) ५०४८७ (२३-०१-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) येथील १६ मच्छीमाराना पाकिस्तानी मेरी टाईम सिक्योरिटी एजन्सीने अटक केल्याची बाब दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,"पुस्ती कृपा" आणि "मस्त्यगंधा" या दोन भारतीय मासेमारी बोटी त्यांनी ताब्यात घेतल्या असून सदर प्रकरणी पालघर जिल्हा प्रशासनाकडे काहीही माहिती नसल्यामुळे स्थानिक मच्छिमारांमध्ये भितिचे वातवरण निर्माण झाले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मच्छिमार कामगारांची पाकिस्तानच्या ताब्यातून सुटका करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी मुख्यमंत्री यांना माहे. ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच ताब्यात घेतलेल्या मच्छिमारांची सुटका होई पर्यंत अशा मच्छिमार कामगारांच्या कुटुंबियांना प्रतिदिन रु. ३००/- मदत गुजरात शासन देत असून त्याप्रमाणे राज्य शासन मदत देणार काय,

(५) असल्यास, यासर्व मच्छिमारांची पाकिस्तानच्या ताब्यातून सुटका करण्यासाठी केंद्र शासनाने व राज्य शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे , नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२),(३),(४) व (५) सदरहू दोन्ही बोटी गुजरात राज्यात नोंदणीकृत आहेत.

आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून पर देशाच्या हद्दीत गेलेल्या भारतीय नागरिकांना सोडवून आणण्याची बाब देशाच्या परराष्ट्र धोरणातील मुत्सद्देगिरीशी संबंधीत आहे. मासेमारी करण्यासाठी इतर देशांच्या सागरी हद्दीत गेलेल्या नागरिकांच्या सुटकेसाठी केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाकडून कार्यवाही करण्यात येते.

तसेच कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय दि.०२/०८/२०२३ अन्वये महाराष्ट्र राज्यातील मच्छिमार पाकिस्तानच्या मेरीटाईम सिक्युरिटी एजन्सीने पकडल्यास अशा खलाशांच्या कुटुबांना उदरनिर्वाहासाठी रु.३०० इतक्या रक्कमेची आर्थिक मदत देण्यात येत आहे.

प्रश्नात नमूद बोटी ह्या गुजरात राज्यात नोंदणीकृत असून याप्रकरणी महाराष्ट्रातील ७ नाविकांसह एकुण १६ मच्छिमाराची सुटका होण्याच्या अनुषंगाने मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र राज्य यांनी केंद्रशासनाकडे पत्राव्दारे विनंती केली आहे.

---

### बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पास विलंब लागत असल्याबाबत

**(१२) ५०८३२ (२९-०१-२०२३). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पास विलंब होत असल्याने प्रकल्पाच्या खर्चामध्ये वाढ होत असून प्रकल्पाचे काम विनाविलंब सुरु रहावे आणि कंत्राटदारांची देयकेही वेळच्या वेळी देण्यात यावी यासाठी म्हाडाला मोठ्या निधीची आवश्यकता भासणार असल्याची बाब ०४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पार्श्वभूमीवर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी २ हजार कोटी चे कर्ज एक टक्का दराने उपलब्ध करून द्यावे अशी मागणी म्हाडाने शासनाकडे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०४-१०-२०२३) :**(१) व (२) होय.

(३) व (४) बी.डी.डी. चाळीसंदर्भातील विविध मुद्यांबाबत निर्णय घेण्यासाठी मा. उप मुख्यमंत्री तथा तत्कालीन मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१/११/२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीमध्ये प्रकल्पासाठी म्हाडाने झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाकडून तसेच अन्य कोणत्याही संस्थाकडून कर्ज घेऊ नये, तर सदरहू प्रकल्पामधूनच कशा प्रकारे निधी उपलब्ध होईल याबाबतचे नियोजन करावे, असे निर्देश मा. उप मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत.

---

### बजाज अलायन्स या जीवन विमा कंपनीचे रिलेशनशिप मॅनेजर यांनी विमा धारकांची केलेली फसवणूक

**(१३) ५२५५९ (१८-०१-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उल्हासनगर येथील एक हॉटेल व्यावसायिक व त्याच्या कुटुंबियाची आयुर्विमा काढलेले असतांना त्यांचे नांव मोबाईल नंबर व फोटो बदलून बजाज अलायन्स या जीवन विमा कंपनीचे रिलेशनशिप मॅनेजर व त्यांच्या साथीदारांनी सुमारे ४६ लाखाची फसवणूक केली असल्याचे दि.०८ ऑक्टोबर २०२२ दरम्यान निदर्शनांस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी उल्हासनगर मध्यवर्ती पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचेही निदर्शनास आले , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने विमा धारकाचे पैसे परत मिळवून देण्याबाबात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०२३) :**(१). होय.

(२) व (३). होय,

प्रस्तुत प्रकरणी उल्हासनगर मध्यवर्ती पोलीस ठाणे गु.र.क्र. ०३५३/२०२२ भा.दं.वि. कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, १२० (बी) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६७ (ड) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन यामध्ये ०३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपी विरोधात दि. २/२/२०२३ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केलेले असुन प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

विमाधारकांची फसवणुक झाल्याने निदर्शनास आल्याने विमा कंपनीने विमाधारकांची मुळ पॉलीसी पूर्ववत केली आहे.

---

**म्हाडाने संक्रमन शिबिरातील पात्र-अपात्र रहिवाश्यांच्या पुनर्वसनाचे धोरण तयार करण्यबाबत**

**(१४) ५४९९८ (२९-०१-२०२३). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व मुंबई उपनगरांमध्ये म्हाडा अंतर्गत बांधलेल्या संक्रमण शिबिरातील इमारतींमध्ये पात्र लाभधारकांच्या ऐवजी अन्य रहिवाश्यांना अधिकृत करण्याचे धोरण मान्यतेसाठी शासनाकडे पाठविले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गृहनिर्माण विभागाने दिनांक १३ सप्टेंबर २०१९ रोजी परिपत्रक काढून संक्रमण शिबिरातील अपात्र रहिवाश्यांना पात्र केले हे देखील खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाकडे संक्रमण शिबिरातील पात्र-अपात्र रहिवाश्यांच्या पुनर्वसनाचे धोरणच तयार नसल्याने शिबिरांचा पुनर्विकास प्रलंबित आणि अपात्र रहिवाश्याना संरक्षण मिळून ते अधिकृत होतील ही बाब म्हाडाकडून दुर्लक्षित केली जात आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संक्रमण शिबीरातील अपात्र रहिवाश्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :** (१), (२), (३) व (४) म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील अधिकृत, अपात्र, अनधिकृत भाडेकरु /रहिवाशी यांना पुनर्विकसीत होणाऱ्या संक्रमण शिबीरांमध्ये गाळे वाटप करुन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत दि.१३.०९.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयामध्ये खालील प्रमाणे तीन प्रवर्ग करण्यात आले आहेत.

अ) मुळ रहिवाशी यांना संक्रमण शिबीरामध्ये स्थानांतरण करण्यात आलेले आहे.

ब) अशा प्रकारचे रहिवाशी ज्यांनी मुखत्यारपत्र (Power of attorney) किंवा तत्सम प्राधिकार पत्राव्दारे मूळ रहिवाश्यांकडून संक्रमण शिबीरातील गाळयांचा हक्क घेतला आहे. हा व्यवहार जरी बेकायदेशीर असला, तरीही झालेल्या व्यवहारामध्ये त्यांनी काही आर्थिक रक्कम दिली असल्याने सहानभूतीपूर्वक दृष्टीकोनातून सदनिकेच्या बांधकाम खर्चाची रक्कम (Construction cost) व पायाभूत सोयी-सुविधांचा खर्च (Infrastructure cost) त्यांच्याकडून वसूल करुन पुनर्वाटप करण्यात येणारे गाळे त्यांच्या नावावर हस्तांतरीत करण्यात यावेत. यासाठी मुद्रांक शुल्क व लागु असलेल्या इतर कोणत्याही प्रकारच्या शासकीय शुल्काची रक्कम गाळेधारकाने भरणे आवश्यक राहील.

क) अशा प्रकारचे घुसखोर रहिवाशी ज्यांनी म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील गाळयांचा अनधिकृतपणे ताबा घेतला आहे. या प्रवर्गातील गाळेधारक १०० टक्के घुसखोर असले तरी देखील सदर गाळेधारकांना प्रधानमंत्री आवास योजनेच्या मूळ अटी /शर्ती (जसे भारतामध्ये स्वत:च्या मालकीचे घर नसणे, रु.३/६ लक्ष उत्पन्न मर्यादा) हे निकष पुर्ण करणाऱ्या गाळेधारकांकडून संक्रमण शिबीरातील सदनिकेच्या बांधकाम खर्चाची रक्कम (Construction cost) व पायाभूत सोयी-सुविधांचा खर्च (Infrastructure cost) व या दोन्ही खर्चाची रक्कम मिळून येणाऱ्या रकमेवर २५ टक्के दंडाची रक्कम वसूल करावी. यासाठी मुद्रांक शुल्क व लागु असलेल्या इतर कोणत्याही प्रकारच्या शासकीय शुल्काची रक्कम गाळेधारकाने भरणे आवश्यक राहील.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबीरातील रहिवाश्यांचे बायोमेट्रिक सर्व्हेक्षण करुन (अ,ब,क) वर्गवारी नुसार पुनर्वसनाची कार्यवाही करण्यासाठी विकसीत करण्यात आलेल्या ॲपमध्ये आधार Authentication ची सुविधा अंतर्भूत करण्याबाबत इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकार (MEITY) यांनी मान्यता दिली असून, त्यानुषंगाने अधिसूचना प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु आहे.

शासन निर्णय दि.१३.०९.२०१९ च्या विरुध्द मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.०१/२०२० श्री.यावर हुसेन गुलाम उमाटिया व इतर यांनी दाखल केली आहे. सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालय यांनी दि. २०.१०.२०२० रोजीच्या आदेशान्वये "पुढील न्यायालयीन आदेश प्राप्त होईपर्यंत सदर शासन निर्णयानुसार पुनर्वसनाची कार्यवाही करु नये" असे आदेशित केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंदगड (जि.कोल्हापूर) येथील, घटप्रभा हिरण्यकेशी व ताम्रपर्णी या तीन नद्यांमधील साचलेला गाळ काढण्याबाबत

**(१५) ५५४५० (२२-०१-२०२३). श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) येथील चंदगड, गडहिंग्लज व आजरा या तालुक्यांचा समावेश असून या ठिकाणी पावसाचे प्रमाण जास्त असून घटप्रभा, हिरण्यकेशी व ताम्रपर्णी या तीन नद्या या तालुक्यातून वाहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे उपरोक्त नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे त्या उथळ होऊन नद्यांचे पात्र रुंदावल्यामुळे नदीतील पाणी निवासी भागात येत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नद्यांमधील साचलेला गाळ काढणे अत्यावश्यक असून मनरेगासारख्या योजनांमधून नदीतील गाळ काढण्याचा समावेश केल्यास नद्यांचे पात्र खोल होऊन पूराची होणारी तीव्रता कमी होण्यास मदत होणार असून स्थानिक नागरीकांनासुध्दा रोजगार उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या नद्यांमधील साचलेला गाळ काढण्यासाठी या कामाचा समावेश मनरेगा या योजनेत अंतर्भाव करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्रामुख्याने घटप्रभा उपखो-यामधील सर्व नद्यांना सन-१९८९, २००५, २०१९ व २०२१ यावर्षी महापूर आले. त्यावेळी नदीकाठाच्या शेतीमध्ये काही ठिकाणी पाणी शिरले होते.

(३) होय अंशत: खरे आहे.

मनरेगा योजनामध्ये जलाशयातील गाळ काढण्याची कामे घेण्यात येतात.

तथापि, प्रमुख शहरातून वाहणाऱ्या नदीतील गाळ काढून नदी प्रवाहातील अडथळे दूर करण्यासाठी धोरण ठरविण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीपथावर आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर त्यातील तरतूदीनुसार विषयांकित नदीतील गाळ काढणेबाबत पुढील कार्यवाही करणे नियोजित आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भायखळा, मुंबई येथील संक्रमण शिबिरातील मान्यता दिलेले गाळे संबधित सदनिकाधारकांना वितरित करण्याबाबत

**(१६) ५५५५६ (२९-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा, मुंबई येथील संक्रमण शिबिरातील मान्यता दिलेले गाळे संबधित सदनिकाधारकांना वितरित करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दि. २७ जुलै२०२२ रोजी वा त्यासुमारास सह मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, वांद्रे यांना लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबधित सह. मुख्य अधिकारी आपल्या अधिकारांचा गैरवापर करुन गैरकारभार करीत असल्याचेही निदर्शनास येत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअुनषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे,

गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय दि.२९.०६.२०२२ रोजी पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे :-

अ) मुंबई इमारती दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे सद्य:स्थितीत उपलब्ध असलेल्या संक्रमण शिबिरांची संख्या कमी असून, संक्रमण शिबिरांची मागणी जास्त आहे. तसेच संक्रमण शिबिरांकरिता विशेषत: दक्षिण मुंबईत रिकाम्या संक्रमण शिबिरांची गरज आहे. सबब, जुन्या निष्काषन सूचना गाळेधारक (दि.०१.०१.२०१८ पुर्वीचे) यांना संक्रमण शिबिर वितरीत करण्यात येणार नाही. त्यामुळे अशा पात्र निष्काषन सुचना गाळेधारक यांनी बृहतसूचीवरुन गाळा मिळण्याकरिता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे अर्ज करावा. सदरहू वितरण ऑनलाईन सोडत पध्दतीने प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला करण्यात यावे.

मा.लोकप्रतिनिधी यांनी सादर केलेल्या निवेदनामधील अर्जदार यांच्या निष्काषन सूचना ह्या दि.०१.०१.२०१० पूर्वीच्या असल्याने सदर रहिवाश्यांना संक्रमण गाळयाची मागणी न करता अशा निष्काषन सूचना धारकांनी बृहतसूचीवरुन कायमस्वरुपी गाळयासाठी अर्ज करण्याबाबत संबंधित अर्जदार यांना दि.१३.१२.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट ॲक्ट १९६३ (मोफा) हा कायदा रद्द करण्याचा निर्णय

**(१७) ५५९८० (२९-०१-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील बांधकाम व्यावसायिकांच्या संघटनेने दोन वर्षापूर्वी शासनास दिलेल्या निवेदनाच्या आधारे पुनर्विकासात अडथळा असलेली मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया टाळण्यासाठी सोसायटी आणि रहिवाशी यांच्या संरक्षणासाठी असलेल्या महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट ॲक्ट १९६३ (मोफा) हा कायदा रद्द करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याचे दिनांक २५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकार विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी विकासकाबरोबर आर्थिक संगनमत करुन सदरहू मोफा कायदा रद्द करण्यासाठी एका परिपत्रकाद्वारे यासंदर्भात अहवाल मागवून कार्यवाही सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मोफा कायदा शासनाने सोसायटी व रहिवाशी यांचे संरक्षण काढून रद्द करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यभरात मोफा अंतर्गत नोंदणी असलेल्या १ लाख ३० हजार गृहनिर्माण संस्थांपैकी जेमतेम १२-१३ हजार संस्थांचे अभिहस्तांतरण झाले असल्याने उर्वरित संस्थांचे विनाविलंब अभिहस्तांतरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) : (**१), (२) व (३) केंद्र शासनाने स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ दि. २३.०६.२०१६ रोजी अधिसूचित केला. त्यानुषंगाने राज्यात दि. ०१.०५.२०१७ पासून सदर अधिनियम लागू केला आहे. महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, १९६३ अधिनियमातील तरतूदी या आता लागू करण्यात आलेल्या स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतूदींशी मिळत्याजुळत्या आहे. राज्यामध्ये स्थावर संपदा क्षेत्रातील होणाऱ्या व्यवहारांचे नियमन करण्याच्या प्रयोजनाकरिता दोन वेगवेगळे अधिनियम अस्तित्वात आहेत. स्थावर संपदा क्षेत्रातील व्यवहारांचे नियमनाच्या कामकाजामध्ये एकसुत्रता निर्माण करून प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. याअनुषंगाने, मोफा अधिनियम, १९६३ निरसित करणे उचित होईल किंवा कसे तसेच, मोफा अधिनियम निरसित न करता त्यामध्ये अन्य तरतूदींची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग व विधी व न्याय विभाग यांच्याशी विचारविनिमय सुरु आहे.
(४) राज्यात दि.३१.०१.२०२३ अखेर एकूण नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था १,२०,४०६ आहेत. त्यामध्ये म्हाडा अंतर्गत संस्था, शासकीय जमीन व प्लॉट धारकांच्या संस्था अशा मानीव अभिहस्तांतरण आवश्यक नसलेल्या संस्था २०,४२१ आहेत. मानीव अभिहस्तांतरण झालेल्या संस्था २२,०९१ असून, ७७,८९४ संस्थाचे मानीव अभिहस्तांतरण होणे बाकी आहे.

शासन निर्णय दि.३१.०५.२०२३ अन्वये स्वयंपुनर्विकास करण्याचा निर्णय घेणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थानी मानीव अभिहस्तांतरणाचा प्रस्ताव सादर केल्यास, सक्षम प्राधिकाऱ्याकडून सदर प्रस्तावावर नमुना क्र.१० ची नोटीस दिल्याच्या तारखेपासून १ महिन्याच्या कालावधीत निर्णय घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील म्हाडाच्या १९९४ च्या ९८ चारकोप कांदिवली पश्चिम येथील व इतरही जागतिक बँक प्रकल्पातील लाभार्थी २७ वर्ष घराच्या प्रतीक्षेत असल्याबाबत**

**(१८) ५६४५२ (२९-०१-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडा मंडळाच्या सन १९९४ च्या ९८ अ चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई येथील इतरही जागतिक बँक प्रकल्प योजनेतील भूखंड सागरी हद्द व्यवस्थापनात प्रलंबित राहिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेली २७ वर्ष या योजनेतील शेकडो लाभार्थी सातत्याने राज्य शासनाकडे पाठपुरावा करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सागरी हद्द व्यवस्थापनात केंद्र सरकारने नविन आराखडा मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर आराखड्यानुसार प्रलंबित लाभार्थींना भूखंड देण्याबाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०४-१०-२०२३) :**(१), (२) व (३) होय.
(४) केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाने दि.१८/०१/२०१९ रोजी सुधारीत सागरी निर्बंधांबाबत अधिसूचना जारी केली आहे व त्यानुसार दि.२९/०९/२०२१ रोजी सुधारीत सागरी निर्बंध आराखडे प्रसिध्द केले आहेत.

सदर आराखड्यानुसार प्रत्यक्ष जागेवर सिमांकन करुन त्यानुसार CRZ नकाशे तयार करणेकरीता केंद्र शासनाने

दि.२०/०४/२०२२ रोजी National Centre for Sustainable Coastal Management (NCSCM) या संस्थेस नियुक्त केले आहे. सदर संस्थेमार्फत सिमांकनाची कार्यवाही सुरु असून, त्यांनी दि.२८/११/२०२२ रोजी प्रारुप नकाशे म्हाडास सादर केले आहेत. या नकाशांची म्हाडामार्फत पडताळणी करुन, संस्थेच्या प्रतिनिधींसोबत दि.२१/०२/२०२३ रोजी स्थळ पाहणी करण्यात आली आहे. त्यानुसार NCSCM या संस्थेकडून अंतिम नकाशे लवकरच सादर करण्यात येणार आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील होमगार्ड कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या प्रलंबित असल्याबाबत

**(१९) ५६५६९ (०८-०५-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ५०,००० होमगार्ड कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, होमगार्ड कर्मचाऱ्यांना वर्षभर काम मिळत नसून त्यांच्यावर बेरोजगारी व उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर होमगार्ड कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) राज्यातील होमगार्डच्या विविध समस्यांबाबत दि.१०.०१.२०२२ रोजी तत्कालिन मा. उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत राज्यातील होमगार्डना वर्षातून १८० दिवस काम देण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे. सद्यस्थितीत होमगार्डसना सरासरी १२० ते १४० दिवस कर्तव्य उपलब्ध होत आहे.

विविध कारणांने अपात्र ठरलेल्या होमगार्डना कामावर रुजू करुन घेणेबाबत महासमादेशक, होमगार्ड यांच्या दि.३१.३.२०२२ च्या आदेशान्वये सर्व जिल्हा कार्यालयांना कळविण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. तसेच, वय वर्षे ४५ ते ५५ वयोमर्यादा असलेल्या होमगार्ड सदस्यांना मैदानी चाचणी कायमस्वरुपी बंद करण्यात आलेली आहे. तसेच साप्ताहिक कवायती दर महिन्याच्या प्रत्येक रविवारी चालु करण्यात आलेल्या आहेत.

राज्यातील होमगार्डच्या कल्याणाच्या अनुषंगाने एचडीएफसी बँकेशी करार करण्यात आला असून त्यानुसार होमगार्डसना महासमादेशक कार्यालयाच्या दि.२८.०६.२०२२ च्या आदेशान्वये पुढीलप्रमाणे सोयी-सुविधा देण्यात आल्या आहेत:-
१) विनामुल्य वैयक्तीक अपघात विमा (५० लाख रूपये Without POS conditions).
२) विनामुल्य वैयक्तीक अपघात विमा (१० लाख रूपये With POS conditions).
३) विनामुल्य स्थायी अपघाती विकलांगता विमा ५० लाखापर्यंत.
४) विनामुल्य स्थायी अंशिक अपघाती विकलांगता विमा ५० लाखापर्यंत.
५) विनामुल्य शैक्षणिक लाभ ४ लाखापर्यंत खातेधारकाच्या अवलंबित असलेल्या पाल्यांना (निधन झालेल्या प्रकरणी)
६) रूग्णालयात दाखल झाल्यावर १५ दिवसांपर्यंत दररोज रु.१०००/- प्रमाणे विनामुल्य लाभ.
७) विनामुल्य जीवन विमा ४ लाख व अतिरिक्त अन्य सोयी सुविधा.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विक्रोळी कन्नमवार नगर ( मुंबई )येथील म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांकडुन अवाजवी सेवाशुल्क आकारण्यात येत असल्याबाबत

**(२०) ५६६७७ (२८-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विक्रोळी कन्नमवार नगर येथील इमारत क्रमांक १६५ ते १९० या सारख्याच क्षेत्रफळाच्या असून या इमारती पालिकेच्या असेसमेंट कर भरतात, एन.ए.कर देतात, जिन्यातील विजेचे बिल , सफाई कामगारांचा पगार , म्हाडा चे भाडे याचाही भरणा केला जातो तरीही या इमारतींना १४९० रुपये सेवाशुल्क आकारले जाते तर संक्रमण शिबिरासाठी हे शुल्क ५०० रुपये आकारले जात असून ज्या सेवा म्हाडा गृहनिर्माण संस्थांना देत आहे त्याच सेवा संक्रमण शिबिरांना दिल्या जातात असे असतानाही म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांवर अवाजवी सेवाशुल्क आकारले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गृहनिर्माण संस्थाना सेवा शुल्काची देयके संक्रमण शिबिरांप्रमाणेच आकारण्यात यावीत अशी मागणी कन्नमवार नगरातील गृहनिर्माण संस्थांनी मा. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन सदर मागणीच्या अनुषंगाने म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांना सेवा शुल्काची देयके संक्रमण शिबिराप्रमाणे आकारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे काय वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-१०-२०२३) :** (१) कन्नमवार नगर, विक्रोळी (पू) येथील म्हाडा वसाहतीमध्ये जलपुरवठा व मल:निस्सारण इत्यादी सुविधा म्हाडामार्फत पुरविण्यात येतात. सदरहू जलवाहिन्या, मल:निस्सारण यंत्रणा इ.च्या दैनंदिन देखभाल दुरूस्तीचा खर्च म्हाडामार्फत करण्यात येतो. तसेच सदरहू वसाहतींमधील जमिनीबाबत शासनाकडे भरण्यात येणारा अकृषिक कर, विमा कर, कर्मचाऱ्यांचे पगार, जमिनीचे भूभाडे इत्यादी एकत्रित करून सेवा आकाराची परिगणना करण्यात येते. सन २०१५-१६ पर्यंतचा सेवा आकार परिगणित करण्यात आला असून त्यापुढील कालावधीसाठी प्रत्येक वर्षी १०% वाढ गृहीत धरून सद्य:स्थितीत प्रत्येक गाळयास प्रति महिना रू.१४९०/- इतके सेवा शुल्क आकारण्यात येते. त्यामुळे ते अवाजवी नाही.

सदर वसाहतींमधील म्हाडाच्या मालकीच्या संक्रमण शिबिरांकरीता म्हाडाच्या स्वतंत्र धोरणानुसार संक्रमण शिबिरातील प्रत्येक गाळयाकरीता रू.५००/- इतके मासिक सेवा शुल्क आकारण्यात येत आहे.

(२) होय.

(३) कन्नमवार नगर को.ऑप. हौसिंग सोसायटी असोसिएशन मर्या. यांनी दि.२.१.२०२३ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने, कन्नमवार नगर, विक्रोळी (पू) येथील वसाहतींमध्ये म्हाडामार्फत ज्या सुविधा पुरविण्यात येतात त्या सुविधांच्या देयकांच्या आधारेच सेवाशुल्क आकारण्यात येत असल्याचे म्हाडाने सदरहू संस्थेस दि.१९.६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. मालकी तत्वावर दिलेल्या गाळयांबाबत आकारावयाचे सेवाशुल्क व संक्रमण शिबिरातील गाळयांसाठी आकारण्यात येणाऱ्या सेवाशुल्काबाबत म्हाडाचे स्वतंत्र धोरण असल्याने, मालकी तत्वावर वितरीत केलेल्या गाळयांसाठी संक्रमण शिबिरातील गाळयांसारखेच सेवाशुल्क आकारता येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## मुंबईतील ग्रॅण्टरोड येथील ब्राम्हणवाडी भाडेकरूंशी विकासकाने पुनर्विकास योजनेच्या नावाखाली केलेला गैरव्यव्हार

**(२१) ५६६८० (२८-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ग्रॅण्टरोड येथील ब्राम्हणवाडी सर्व्हे नं. ११९१-११९२ व इतर (जागेपैकी) ११ इमारतीच्या पुनर्विकास योजनेच्या नावाखाली विकासकाने बेकायदेशीर व्यवहार करुन तेथील भाडेकरूंची फसवणूक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भाडेकरु यांनी प्रधान सचिव (गृहनिर्माण), मुख्य कार्यकारी अधिकारी (झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण) यांच्याकडे दिनांक २ डिसेंबर, २०२२ रोजी विकासक भाडेकरूंची व शासनाची दिशाभूल करीत असल्याबाबत सखोल चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतचे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :**(१) व (२) प्रकल्पातील भाडेकरु यांनी भाडेकरुंना विकासकाने विस्थापित केले आहे व विकासक वेळेवर भाडे देत नाही. भाडयासाठी भाडेकरुंना कोर्टात जावे लागते अशी तक्रार दि.०२.१२.२०२२ रोजीच्या पत्रानुसार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाला केली आहे.

(३) भाडेकरु/रहिवाश्यांना विकासकामार्फत पर्यायी संक्रमण व्यवस्थेचे भाडे देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोदावरी खोऱ्यामध्ये जायकवाडी प्रकल्पाच्या वरील बाजूस कोणतेही नवीन प्रकल्प हाती न घेणे बाबतच्या परिपत्रकात सुधारणा करण्याबाबत

**(२२) ५७४८१ (२८-०४-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी खोऱ्यात व जायकवाडी प्रकल्पाच्या वरील बाजूस कोणतेही नवीन प्रकल्प घेऊ नयेत असे शासन परिपत्रक काढण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिपत्रकानुसार राज्यातील अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील काही कायमस्वरूपी दुष्काळी गावातील शेतकऱ्यांना छोटे सिमेंट बंधारे साठवण तलाव व के टी वेअर यांच्याशिवाय पाण्याचा कोणताही स्त्रोत नसलेल्या शेतकऱ्यांवर अन्याय झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार जायकवाडी प्रकल्पामध्ये पाण्याची तूट निर्माण होईल असे लघु मध्यम व मोठे पाटबंधारे प्रकल्प हाती घेऊ नयेत, तसेच ३.५० द.ल.घ.फु. पर्यंत पाणी साठवण क्षमता असलेले साठवण बंधारे सिमेंट बंधारे व के टी वेअर कामांसंदर्भात परिपत्रकात सूट देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही,

" मा. उच्च न्यायालयाचे जनहित याचिका क्र. १७३/२०१३ चे अनुषंगाने दिनांक २३/०९/२०१६ रोजीचे जायकवाडी प्रकल्पाचे वरील बाजूस कोणतेही नविन प्रकल्प हाती न घेणेबाबतच्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे." असे जलसंपदा विभागाचे दिनांक २५/०४/२०१९ च्या ५ द.ल.घ.फू. पेक्षा जास्त साठवण क्षमतेच्या पाणी वापराच्या सर्व जलसंधारण / जलसंपदा योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र अनिवार्य करण्याबाबतची अट सुधारित करणेबाबत निर्गमित परिपत्रकामध्ये नमूद आहे.

(२) जायकवाडी प्रकल्पाचे वरील बाजूस कोणतेही नविन प्रकल्प हाती न घेण्याबाबत मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) मा. उच्च न्यायालयाचे जनहित याचिका क्र. १७३/२०२३ चे अनुषंगाने दिनांक २३/०९/२०१६ रोजीचे जायकवाडी प्रकल्पाचे वरील बाजूस कोणतेही नविन प्रकल्प हाती न घेणेबाबत आदेश आहेत. तथापि, मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दि. ३०/११/२०१७ रोजी संपन्न झालेल्या राज्य जलपरिषदेच्या चौथ्या बैठकीत एकात्मिक जल आराखडा-गोदावरी खोरे च्या खंड I मधील परिच्छेद ९.१.२ (पृ. ३३०) मध्ये विहित प्रमाणे जलसंधारणाची कामे करण्यात यावी. या व्यतिरिक्त पाझर तलाव / को.प्र.बंधारे इत्यादि पाणी साठवण करण्याचे बांधकाम करावयाचे झाल्यास खालचे पाणी अडवले जाणार नाही. किंवा जायकवाडी धरणाच्या साठवणीत विपरीत परिणाम होणार नाही. याची खात्री करावी, यासाठी एक उच्चधिकार समिती (High Power Committee) जलसंधारण विभागाने गठित करावी. सदर समितीच्या शिफारशी शिवाय कोणतेही पाणी साठवण करण्याचे बांधकाम करु नये. असे निर्देश दिले आहेत. सदरील निर्देशानुसार जायकवाडी धरणाच्या उर्ध्व बाजूकडील जलसंधारणाची कामे जलसंधारण विभागाने करणे आवश्यक आहे.

---

## नाशिक जिल्ह्यातील "पार गोदावरी उपसा जोड योजना क्र. ३ व ४ ला प्रशासकिय मान्यता मिळण्याबाबत

**(२३) ५८३२३ (२६-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील पश्चिमवाहिनी पार नदीचे पाणलोट क्षेत्रातील पश्चिमेकडे वाहून जाणारे पाणी मांजरपाडा बोगद्याद्वारे तुटीच्या गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी "पार गोदावरी उपसा जोड योजना क्र. ३ व ४" या योजनेला लवकारात लवकर प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.३ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांनी राज्यतांत्रिक सल्लागार समितीकडे दि. ३० जुलै २०२१ रोजी या योजनेचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल मंजुरीसाठी पाठवलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोदावरी खोऱ्यातील पाण्याची तुट भरून काढण्यासाठी पार गोदावरी उपसा जोड योजना क्र. ३ व ४ या योजनेला मंजुरी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे महामंडळाच्या दि. ३०/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मंजूरीस्तव सादर आहे.

SLTAC कार्यालयामार्फ़त उपस्थित मुद्यांचे अनुपालन अहवाल महामंडळाचे पत्र दि. ०८/०५/२०२३ अन्वये, राज्य स्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना सादर करण्यात आलेला असून त्याची तपासणी सुरू आहे.

(३) पार-गोदावरी उपसा जोड योजना क्र. ३ व ४ च्या प्रकल्प अहवालास राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांची मान्यता तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ कलम ११ (च) अंतर्गत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर, राज्याच्या आर्थोपायाची स्थिती व मा. राज्यपाल महोदयांचे निर्देश यानुसार प्रशासकीय मान्यता देणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मालेगांव (जि.नाशिक ) येथे पोलिस कर्मचा-यांच्या वसाहतीची झालेली दूरवस्था

**(२४) ५८९६५ (०३-०५-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक ) येथे पोलिस कर्मचा-यांसाठी बांधलेल्या वसाहतीची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याचे माहे जानेवारी ,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोकादायक व दयनीय इमारतीत पोलिस कर्मचा-यांचे कुटुंबिय वास्तव करित असून सदर इमारतीला व पोलिसांच्या घरांना सरंक्षक भिंत नसणे, खिडक्या व दरवाजे तुटलेले असणे, शौचालयांचे ड्रेनेज उघडे असणे, पाईप तुटलेले असणे, सर्वत्र दुर्गंधी अशा वातावरणात पोलिस कर्मचारी राहत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांसाठी रावळगाव नाका भागात सुसज्ज वसाहत उभारण्यात आली असून त्याठिकाणी ८० टक्के कर्मचारी स्थलांतरीत झाले असले तरी रावळगाव नाका हिंमतनगर भागातील जुन्या पोलिस वसाहतीची वाताहत झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिवस-रात्र सर्वसामान्य नागरिकांची सेवा करणा-या पोलिसांच्या वसाहतीच्या झालेल्या दयनीय अवस्थेच्या पाहणीसह सदरहू पोलिस वसाहतीच्या नुतनीकरणाकरिता निधी
उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हिंमतनगर येथे एकुण ४४५ शासकीय निवासस्थाने असुन सदर निवासस्थानामध्ये एकुण ३० पोलीस अंमलदार व त्यांचे कुंटुंबिय वास्तव्य करित आहेत. परंतू हिंमतनगर येथील सर्व शासकीय निवासस्थाने हे नादुरुस्त आहेत.

(४) व (५) पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरिता मालेगांव येथे २०५ निवासस्थानाचे बांधकाम महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळ यांचेकडुन सन २०२१ मध्ये करण्यात आले आहे. सदर निवासस्थानामध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार व त्यांचे कुंटुंबिय वास्तव्य करित आहेत. तसेच, मालेगांव येथील जुनी पोलीस लाईन पोलीस वसाहतीचे नुतनीकरण व दुरुस्ती करण्याबाबत प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना पाठविण्याची कार्यवाही पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांचेकडुन करण्यात येत आहे.

---

### मालखेड तलाव (जि. अमरावती) येथील कृष्णाजी सागर पर्यटन स्थळ ता चादूर रेल्वे बंद असल्याबाबत

**(२५) ५८९८८ (०३-०५-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालखेड तलाव (जि.अमरावती) येथील कृष्णाजी सागर पर्यटन स्थळ महत्वाच्या पर्यटनस्थळांपैकी असून ते बंद पडले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पर्यटन स्थळ असलेल्या मालखेड तलाव येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक व शालेय सहली येतात परंतू सदर तलाव हा बंद असल्याने शासनाचा महसूल बुडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पर्यटनस्थळ हे करार पद्धतीने कंत्राटदाराना चालवण्यास दिले गेले असून मागील करार हा दोन वर्षांचा असतांना कोरोना काळात उक्त पर्यटनस्थळ बंद असल्याने एका वर्षांची मुदतवाढ देण्याची मागणी संबंधीत कंत्राटदारामार्फत करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने सदर कंत्राटदारास मुदतवाढ देऊन पर्यटन स्थळ पुन्हा सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) कृष्णाजी सागर पर्यटन स्थळ (मालखेड तलाव) ता. चादूर रेल्वे हे करारपद्धतीने भाडेतत्वावर देण्यात आले होते. दिनांक १६ जानेवारी २०२३ ला सदर करार संपुष्टात आला. त्यानंतर पुन:श्च भाडेतत्वावर देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याने सदर पर्यटन स्थळ दिनांक १७ जानेवारी २०२३ पासुन बंद ठेवण्यात आले होते.

पर्यटनस्थळ पुन:श्च भाडेतत्वावर देण्याकरिता शासनाच्या धोरणानुसार निविदा प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर दिनांक २ मे २०२३ पासुन पर्यटन स्थळ पुन:श्च सुरू करण्यात आले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

कोरोना काळात पर्यटनस्थळ हे साधारण ३८७ दिवस बंद होते. त्यामुळे कंत्राटदारास ३८७ दिवसाची मुदतवाढ देण्यात आली होती.

(४) शासनाच्या धोरणानुसार निविदा प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर दिनांक २ मे २०२३ पासुन पर्यटन स्थळ पुन:श्च सुरू करण्यात आल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील म्हाडाच्या संक्रमण शिबिरात पात्र लाभधारकांकरिता घरे वाटपाचे नवे धोरण व कार्यपध्दती ठरविणेबाबत

**(२६) ५९००० (०२-०५-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या (म्हाडा) संक्रमण शिबिरात केवळ पात्र लाभधारकांना घरे मिळावीत तसेच घुसखोरी रोखण्यासाठी शासनाने घरे वितरीत करण्यासाठी नवे धोरण आणि कार्यपद्धती ठरविण्याकरिता माजी मुख्य सचिव सुरेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञांची समिती गठीत करुन सदरहू समितीने एक महिन्यात याबाबतचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिनांक १७ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई इमारत दु. व पु. मंडळाच्या स्थापनेपासून ते अद्यापपर्यंत म्हाडाने संक्रमण शिबिरात राहत असलेल्या व रस्ता रुंदीकरण व अन्य प्रकल्पातील बाधीतांची एकूण संख्या किती आहे, तसेच आता पर्यंत एकूण किती घरांचे वितरण करुन संक्रमण शिबिरातील प्रतिक्षा यादितील घरांची संख्या कमी करण्यात आली आहे,

(३) असल्यास, मुंबईत इमारत तोडण्यात आल्यानंतर संक्रमण शिबिरात वास्तव्यास गेलेले भाडेकरु त्यांच्या मुळ जागेत इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर नवीन घराचा ताबा घेतलेला असूनही सदरहू भाडेकरु संक्रमण शिबीरातील घराचा ताबा न सोडता अन्य त्रयस्त व्यक्तीस एजंट मार्फत सदर घराची विक्री करुन कोट्यावधी रुपयाचा आर्थिक गैरव्यवहार करुन शासन व म्हाडाची फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले असल्याने या बाबीचा नव्या घरवाटपाच्या धोरणात समावेश करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) तसेच, उक्त समितीमध्ये सदस्य कोण आहेत तसेच कामाची कार्यकक्षा काय आहे त्यानुसार कामाचा अहवाल सादर केला आहे काय, असल्यास केलेल्या शिफारशींवर शासनाच्या अभिप्रायांचे थोडक्यात स्वरुप काय आहे ,

(५) असल्यास, सदरहू घरे वाटपातील दुहेरी घराचा ताबा घेऊन म्हाडाची फसवणूक करणाऱ्या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) मुंबई शहर व उपनगर येथे एकूण २०७०३ संक्रमण गाळे असून,त्यापैकी जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतीमध्ये वास्तव्य करीत असलेल्या तसेच माहुल गांव, चेंबूर प्रदुषण बाधीत, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन बाधीत व

वरळी-न्हावाशेवा रोड बाधीत असे एकूण २०४१५ संक्रमण गाळयाचे वितरण करण्यात आले आहे.
(३) व (४) संक्रमण शिबिरात वास्तव्यास असलेले रहिवाशी यांना त्यांच्या मुळ जागेत इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर किंवा बृहतसूचीवरुन गाळयाचे वितरण करण्यापूर्वी संक्रमण शिबिर गाळयाचा ताबा सोडल्याचे ना - हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय कायमस्वरुपी गाळयाचा ताबा देण्यात येत नाही. रिक्त झालेल्या संक्रमण शिबिरातील गाळा सिल करुन मंडळाच्या ताब्यात घेण्यात येतो. तसेच सदर गाळयात घुसखोरी होऊ नये म्हणून मंडळामार्फत सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.

गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय दि.१७.०१.२०२३ अन्वये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत संक्रमण शिबिराच्या वाटपाचा कार्यपध्दतीमध्ये तसेच बृहतसूचीमार्फत होणाऱ्या गाळयांचे वाटप करण्याच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यासाठी शासनास शिफारस करण्याकरीता श्री.सुरेश कुमार, सेवानिवृत्त भा.प्र.से. यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महादेव कोळी समाजाला जातीचे प्रमाणपत्र मिळण्यास होत असलेला विलंब

**(२७) ५९००२ (१२-०५-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती बेरार प्रांतामधील विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती अंतर्गत जिल्हाधिकारी अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम या जिल्ह्यातील कोळी महादेव समाजाला जमातीचे प्रमाणपत्र मिळणे व संन १९५० चा पूर्वी जातीचा पूर्वीचा पुरावा मागण्याची अट काढून टाकण्याच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त जिल्हाधिकारी अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम तसेच आयुक्त आदिवासी प्रशिक्षण संशोधन संस्था पुणे टी. आर. टी. आय यांनी सदर अहवाल पाठविला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोळी महादेव जमाती संबंधित पूरक निवेदन स्वीकारुन शासन निर्णय निर्गमित करण्याचा अहवाल आयुक्त आदिवासी प्रशिक्षण संशोधन संस्था पुणे यांनी त्यांचे पत्र क्र. ४४७५, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या अन्वये शासनाला सादर केला असून जोपर्यंत अहवालावरील अभिप्राय शासनाकडून प्राप्त होत नाही तोपर्यंत लोकप्रतिनिधी यांना माहिती देऊ शकत नाही, असेही कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोळी महादेव जात प्रमाणपत्र बाबींच्या अडचणी सोडविण्याकरीता दिनांक ६ फेब्रुवारी, २०२२ रोजी आयोजित केलेल्या आढावा बैठकीमध्ये इतिवृत्त तयार करुन जिल्हाधिकारी अमरावती यांनी जिल्हयातील सर्व उपविभागीय अधिकारी महसुल यांना पत्र दिले असून त्यावर आजपर्यंत कोणत्याही प्रकारची सकारात्मक कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर महाराष्ट्र राज्य कृती समितीचे महासचिव उमेश ढोणे यांनी जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त, अमरावती जिल्हाधिकारी यांना माहे डिसेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पत्र देऊन या संबंधात सकारात्मक कार्यवाही होऊन याबाबत जिल्हाधिकारी अमरावती यांनी स्वयंस्पष्ट आदेश काढावे असे पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुख्यमंत्री सचिवालय कक्ष विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती विभाग यांनी त्यांचे पत्र क्रमांक ५७/२०२० दिनांक २१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यादरम्यान मंत्री आदिवासी विकास यांनी दिलेल्या उत्तरामध्ये कोळी महादेव जमाती संबंधी पूरक निवेदन स्वीकारून शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी आदिवासी विकास विभागाला व इतर संबंधित विभागाला आदेश देण्याबाबत पत्र विशेष कार्यकारी अधिकारी मा. मुख्यमंत्री सचिवालय कक्ष विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती यांनी मा.मुख्यमंत्री सचिवालय मुंबई यांना पाठविले असून त्यानंतर माहे डिसेंबर, २०२२ रोजी पुन्हा पत्र देऊन कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कोळी महादेव समाजाला जातीचे प्रमाणपत्र मिळण्यास विलंब करणा-या संबंधितांवर कारवाई करण्यासह सदर जातीचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत शासनस्तरावरुन धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**डॉ. विजयकुमार गावीत (०३-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे. संविधानाच्या अनुच्छेद ३४२खालील महाराष्ट्र राज्यातील क्षेत्रसंबधात दि. ०६ सप्टेंबर, १९५० रोजीच्या राष्ट्रपतीच्या पहिल्या आदेशात आणि त्यांनतर महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत संसदेने वेळोवेळी सुधारणा केलेल्या अनुसूचित जमातीच्या याद्या सुचिबध्द केलेल्या आहेत. अनुसूचित जमातीचा दर्जा संपादन करण्यासाठी राष्ट्रपतीच्या अनुसूचित जमातीच्या आदेशाच्या अधिसूचनेच्या वेळी त्यांच्या वडीलांचे आजोबांचे जे कायमस्वरूपी निवास्थान असेल ते त्यांचे सर्वसाधारण निवासाचे स्थान असेल अशी तरतूद नियमामध्ये असल्यामुळे १९५० पूर्वीचा जातीचा पुरावा मागण्याची अट काढून टाकण्या बाबतचा अहवाल पाठविण्यात आलेला नाही.
(२) होय.
(३) व (४) अशा आशयाची पत्रे विभागास प्राप्त झालेली आहेत.
(५) अनुसूचित जमाती प्रवर्गातील व्यक्तींना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देणे व अशा प्रमाणपत्राची पडताळणी करणे या बाबींचे विनियमन करण्याकरिता "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० लागू केले आहे. व त्यानुषंगाने महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ लागू केले आहे. सदर अधिनियम व नियमातील तरतूदीनुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील भायखळा (प), लक्ष्मी रेसीडेन्सी या पुनर्रचित इमारतीमधील कुटुंबांना विकासकाने घरे दिली नसल्याबाबत

**(२८) ५९०१४ (२६-०४-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भायखळा (प), लक्ष्मी रेसीडेन्सी या पुनर्रचित इमारतीधील श्री.महेंद्र शहा, प्रकाश बोराडे यांचेसह सहा भाडेकरु रहिवाशी कुटुंबांना तत्कालीन गृहनिर्माण मंत्री, प्रधानसचिव – गृहनिर्माण यांनी मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दु. व पु. मंडळ यांना
दि. ५ मार्च२०२०, त्यानंतर माहे एप्रिल, २०२१ मध्ये घराचा ताबा देऊन नोंदणीकृत व्यक्तीस कायमस्वरुपी सदनिकेचा करारनामा व थकीत भाडे देण्याचे आदेश देऊनही अद्याप संबंधित पुनर्विकास प्रकल्प राबविणाऱ्या विकासकाने सदरहू सहा कुटुंबांना अद्याप घराचा ताबा दिला नसल्याचे प्रकार दि. १० जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी मंत्री तसेच प्रधान सचिव यांनी लेखी आदेश देऊनही अद्याप विकासकाने सहा रहिवाशी कुटुंबांना घराचा ताबा देणेबाबत करण्यात आलेल्या दुर्लक्षाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात अ ाली आहे काय, त्याअनुषगाने उक्त सहा बेघर रहिवाशी कुटुंबांना पुनर्रचित इमारतीमध्ये तात्काळ घाराचा ताबा देऊन व करार करुन तसेच थकीत भाडे देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०६-१०-२०२३) :**(१), (२) व (३) श्री.महेंद्र शहा, श्री.प्रकाश बोराडे यांचेसह सहा भाडेकरु/रहिवाश्यांनी जुलै २०२१ मध्ये पुनर्विकसीत इमारतीमधील सदनिकांचा ताबा घेतलेला आहे. तथापी, त्यांनी कायमस्वरुपी पर्यायी निवासस्थानाचे करारपत्रे स्वाक्षरी केलेली नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खडकपूर्णा व पेनटाकळी (जि. बुलढाणा) या प्रकल्पासाठी पश्चिम वाहिनी प्रकल्पातील व्यय होणारे पाणी मिळण्याबाबत

**(२९) ५९३०८ (०३-०५-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकपूर्णा व पेनटाकळी (जि.बुलढाणा) या दोन प्रकल्पासाठी पश्चिम वाहिनी प्रकल्पातील व्यय होणारे पाणी खडकपूर्णा व पेनटाकळी प्रकल्पास मिळाल्यास देऊळगाव राजा व चिखली तालुक्यातील वंचित क्षेत्रास लाभ देणे शक्य होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडकपूर्णा प्रकल्पाचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर पाणी उपलब्धता प्रस्ताव सादर करतांना प्रकल्प ज्या खो-यात आहे त्या खो-यातील जलसंपत्ती मालकी हक्क असलेल्या महामंडळ मुख्य अभियंता यांची पाणी उपलब्धतेबाबत व प्रस्तावित बांधकामाविषयी सहमती आवश्यक असल्याने. त्याअनुषंगाने याबाबतचा सविस्तर अहवाल संबंधित प्रादेशिक कार्यालयाचे पत्र दि. ११ नोव्हेंबर, २०२२ अन्वये मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांची सहमती घेण्यासाठी सादर करण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०९-२०२३) :** (१) होय,खरे आहे.

पश्चिम वाहिनी प्रकल्पातील व्यय होणारे पाणी खडकपूर्णा व पेनटाकळी प्रकल्पास मिळाल्यास देऊळगाव राजा व चिखली तालुक्यातील वंचित क्षेत्रास लाभ देणे शक्य आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील कुणबी समाजोन्नती कार्यालयात एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी बेकायदेशीरपणे प्रवेश करुन बहुजन समाजाच्या कार्यकर्त्यांना केलेली मारहाण

**(३०) ५९७७९ (३०-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भोईवाडा परिसरात असलेल्या कुणबी समाजोन्नती कार्यालयात एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी बेकायदेशीरपणे घुसून बहुजन समाजाच्या कार्यकर्त्यांना जबर मारहाण करण्यात आल्याबाबत दि.१९ जानेवारी, २०२३ रोजी भोईवाडा पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन गुंड प्रवृत्तीच्या कार्यकर्त्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०२३) :** (१) व (२) कुणबी समाजोन्नती संघ, परेल, मुंबई संस्थेच्या कार्यालयात दि. १८/०१/२०२३ रोजी बैठकी दरम्यान एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी विना परवाना प्रवेश करून माधव लक्ष्मण कांबळे यास मारहाण केल्याच्या फिर्यादीवरुन भोईवाडा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. २६/२३, भा.दं.वि. ४५२, ४४८, १४३, १४७, १४९, ३२४, ३२३, ५००, ५०४, ५०६, ३४ अंतर्गत दि.१९/०१/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये एकूण १३ आरोपी निष्पन्न झाले आहेत. यापैकी ०३ आरोपीतांवर अटकेची कारवाई करण्यात आली असून, गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील सुभाषनगर, चेंबूर येथील म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३१) ५९८९८ (०३-०५-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१.) मुंबईतील सुभाषनगर, चेंबूर येथील म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील रहिवाश्यांचे शासन निर्णय क्र..संकीर्ण-१०१४/प्र.क्र.१२०(भाग-२)/दुवपू-२ नुसार आहे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दि.०२ डिसेंबर, २०२२ रोजी लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) : (१)** हे खरे आहे.
(२) सुभाष नगर, चेंबूर संक्रमण गाळे हे नाले लगत असल्याकारणाने सदर ठिकाणी मंडळामार्फत स्वतंत्र पुनर्विकासाची योजना राबविताना मुंबई म.न.पा. च्या नियमानुसार नाला स्वच्छ करणेकरीता ६.०० मीटर रूंद मोकळी जागा सोडणे बंधनकारक आहे. सदर मोकळी जागा वजा करता, संक्रमण गाळयाचा भूखंड हा अविकसनक्षम होतो. त्यामुळे मुंबई मंडळाच्या इमारत क्र.४९ यशो- ज्योती सह. गृह.संस्था सुभाष नगर, चेंबूर या संस्थेसह गृहसाठा हिस्सेदारी तत्वावर संक्रमण शिबीराचा पुनर्विकास केल्यास, मुंबई मंडळास अंदाजे १७८४.८८ चौ.मी. फंजिबल सह ( अंदाजे ३० सदनिका / ६०.०० चौ.मी.) बांधकाम क्षेत्रफळ प्राप्त होणार आहे. सदर सदनिकांची सोडतीमार्फत विक्री केल्यास, सर्व सामान्यांना माफक दरात घरे उपलब्ध होऊ शकतात.

सुभाष नगर, चेंबूर संक्रमण शिबीर चाळ क्र.३ व ४ मधील रहिवाशांना मंडळाच्या स्वदेशी मिल, चुनाभट्टी संक्रमण शिबीरात स्थलांतरीत करण्यात आले आहे. सदरचे सुभाष नगर, चेंबूर संक्रमण शिबीर चाळ क्र. ३ व ४ तोडण्यात आली असून मुंबई मंडळास दि.२६.०६.२०२३ नुसार हस्तांतरण करण्यात आलेली आहे.

सुभाष नगर, चेंबूर संक्रमण शिबिर रहिवाशी संघ यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठ येथे रिट पिटीशन क्र. (लॉ) ३५८५/२०२३ दाखल केले होते. सदर रिट याचिके मध्ये सुभाष नगर, चेंबूर याच ठिकाणी संक्रमण शिबिर रहिवाश्यांचे पुनर्वसन करणेबाबत विनंती केली होती. सदर रिट याचिका मा.उच्च न्यायालयाने दि.११.०४.२०२३ रोजी फेटाळण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पहिल्या व पोट मजल्यावरील फोटोपासधारक झोपडीधारकांना पुनर्वसन योजनेअंतर्गत मोफत घर मिळण्याबाबत**

**(३२) ६००५२ (२६-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पहिल्या किंवा पोट माळयावरील फोटोपासधारक झोपडीधारकांना पुनर्वसन योजनेत मोफत घर योजनेचा लाभ देण्याबाबतचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मंजुरीसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, त्यानुसार सदरहू प्राधिकरणाने पाठविलेल्या प्रलंबित प्रस्तावास शासनाने तात्काळ मंजुरी देऊन त्याची अमंलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील विविध सामाजिक व राजकीय आंदोलनातील कार्यकर्त्यांच्या विरोधात दाखल केलेले व सध्या प्रलंबित असलेले खटले काढून टाकण्याबाबत**

**(३३) ६०५३८ (०३-०५-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील विविध सामाजिक व राजकीय आंदोलनातील कार्यकर्त्यांच्या विरोधात दाखल केलेले व सध्या प्रलंबित असलेले खटले काढून टाकण्याच्या संदर्भात शासनाने परिपत्रक काढले असल्याचे माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सनदशीर मार्गाने बेमुदत आंदोलन, उपोषण करणा-या आंदोलनातील सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांवर पोलीसांनी मुंबई पोलीस अधिनियमाचे तरतुदीखाली गुन्हे दाखल केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आंदोलनात जिवीत हानी व मालमत्तेचे नुकसान झाले नसतानाही आंदोलकांविरोध खटले प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यां विरोधात दाखल केलेले व सध्या प्रलंबित असलेले खटले तातडीने मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत शासनाने दि. २०/०९/२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबतच्या शासन निर्णयानुसार अटींमध्ये बसत नसल्यामुळे तसेच गंभीर स्वरुपाचे गुन्हे असल्यामुळे समितीने खटले मागे घेण्याबाबत शिफारस केली नाही. त्यामुळे खटले न्यायालयात प्रलंबित आहेत.
(४) राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबतचे शासन निर्णय दि. २०/०९/२०२२ नुसार परिमंडळीय पोलीस उपायुक्त / उपविभागीय अधिकारी (महसूल) यांचेस्तरावर समिती स्थापन केली असून सदर समितीमार्फत खटले मागे घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. राजकीय व सामाजिक आंदोलनामध्ये एकूण १४ गुन्हे दाखल असून त्यापैकी ५ गुन्हे मागे घेण्याबाबत समितीने मान्य केले आहेत व ५ गुन्हे मागे घेण्यास समितीने अमान्य केले आहे. प्रत्यक्ष न्यायालयातून १ खटला मागे घेण्यात आला आहे. २ गुन्ह्यांबाबत निर्णय समितीच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जेलमध्ये क्षमतेपेक्षा अधिक कैदी असल्याबाबत**

**(३४) ६०५५९ (०८-०५-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड),**

**श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण ६४ कारागृह असताना त्यात नऊ मध्यवर्ती, एक महिला, २८ जिल्हा, १९ खूल्या कारागृहांचा समावेश असून राष्ट्रीय गुन्हेगारी नोंद विभागाच्या २०२१ च्या अहवालानुसार कारागृहांची एकूण क्षमता २४ हजार ७७२ इतकी असताना सद्यस्थितील एकूण ३६ हजार ८५३ कैदी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये ३५,४६४ पुरुष आणि १३६८ महिला कैद्यांसह २१ तृतीय पंथीयांचा समावेश असून क्षमतेपेक्षा दुप्पट कैद्यांना ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दोषी कैद्यांपेक्षा न्यायलयीन चौकशी (अंडरट्रायल) असलेल्या कैद्यांची संख्या जास्त असल्यामुळे राज्य शासनामार्फत यावर कोणती कार्यवाही करण्यात आली तसेच नवीन कारागृहाची निर्मिती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०२३) :** (१) व (२) राज्यात एकूण ६० कारागृहे आहेत. त्यात ०९ मध्यवर्ती, ३१ जिल्हा कारागृहे, १९ खुली कारागृहे व ०१ महिला खुले कारागृह यांचा समावेश आहे. सदर सर्व कारागृहांची एकूण अधिकृत बंदीक्षमता २४,७२२ इतकी असून, माहे मे, २०२३ अखेर या कारागृहांत एकूण ४०,९०३ इतके बंदी आहेत. यामध्ये ३९३०० पुरुष बंदी, १५८६ महिला बंदी आणि १७ तृतीयपंथी बंद्यांचा समावेश आहे.

राज्यातील कारागृहांत अधिकृत बंदीक्षमतेपेक्षा अधिक बंदी बंदिस्त आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(३) बंद्यांना मोफत कायदे व विधी सहायतेकरीता विविध स्वयंसेवी संस्था तसेच अझीम प्रेमजी ग्रुप (APPI) मार्फत कायदेविषयक सहाय्य पुरविण्यात येते. APPI यांच्याशी झालेल्या सामंजस्य करारानुसार न्यायाधीन बंद्यांना मोफत कायदेविषयक मदत तसेच त्यांच्या जामीनासाठी रकमेची तरतूद करण्यात येते.

• सन २०१६ ते डिसें, २०२२ अखेर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अशासकीय संस्था, टाटा ट्रस्ट यांचेमार्फत एकूण १,२४,२८० एवढया बंद्यांना कायदेविषयक मोफत सल्ला देण्यात आला आहे.

• प्रत्येक कारागृहात मा. जिल्हा न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली बंदी पुनर्विलोकन समितीची स्थापना करण्यात आली असून, सदर समिती न्यायाधीन बंद्यांचा आढावा घेऊन, ज्या बंद्यांची शिक्षा निम्मी भोगून झाली आहे अशा बंद्यांना जामीनावर मुक्त करण्याची कार्यवाही करते.

• कारागृहातील बंद्यांना व्ही.सी.द्वारे नियमितपणे मा.न्यायालयात उपस्थित करण्यात येत असल्यामुळे, त्यायोगे कारागृहातील अतिगर्दीची समस्या कमी होण्यास मदत होते. जाने. २००५ ते मार्च, २०२३ अखेर व्ही.सी.द्वारे हजर करण्यात आलेल्या बंद्यांची संख्या १०,९७,४०१ इतकी आहे.

नारायणडोह (जि. अहमदनगर), पालघर येथे उपलब्ध जागेवर, येरवडा व ठाणे मध्यवर्ती कारागृहांच्या अस्तित्वातील जागेवर तसेच हिंगोली, गोंदिया आणि भुसावळ या ठिकाणी नवीन कारागृह बांधण्यासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. वरळी, मुंबई यांच्याकडून नकाशे, आराखडे व अंदाजपत्रक प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

• त्या व्यतिरिक्त मुंबई मधील मौजे मंडाळे येथील Correctional Facilities या प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या २.०२ हे.आर जागेवर नवीन कारागृह बांधण्याकरीता सदर जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

• राज्यात नवीन कारागृह बांधकामासाठी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात रु.२३.५७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तापी पाटबंधारे महामंडळ अंतर्गत मंजूर असलेल्या तापी महाकाय**
**जलपुर्नभरण प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(३५) ६०६६९ (०८-०५-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तापी पाटबंधारे महामंडळ अंतर्गत मंजूर असलेल्या तापी महाकाय जलपुर्नभरण प्रकल्पाचे (तापी मेगा रिचार्ज स्कीम) नवीन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र व मध्यप्रदेशासाठी वरदान ठरणाऱ्या या प्रकल्पास गती देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०९-२०२३) :** (१) नाही.
सदर प्रकल्पाचे सर्वेक्षण, अन्वेषण व संकल्पन पुर्ण करण्यात येऊन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पाची किंमत रु.१९,२४४ कोटी (दरसुची २०२२-२३) असून मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील अनुक्रमे १२३०८२ हे. व २३४७०६ हे. लाभक्षेत्रास सिंचनाचा फायदा अपेक्षित आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती नाशिक यांचेकडे तपासणीत असुन शेरेपुर्तता कार्यवाहीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंतप्रधान अनुदान प्रकल्पातील इमारतींच्या पुनर्विकास धोरणात सुधारणा करण्याबाबत**

**(३६) ६०९८० (२५-०४-२०२३). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधान अनुदान प्रकल्पातील इमारतींच्या जाहिर केलेल्या धोरणानुसार एकही इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव आजतागायत शासनाकडे किंवा म्हाडा प्राधिकरणाकडे प्राप्त झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पी.एम.जी.पी. इमारतीच्या पुनर्विकास धोरणात सुधारणा करण्याबाबतचा शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :**(१) व (२) नगर विकास विभाग दि.०८.०७.२०२१ रोजीच्या अधिसुचनेनुसार पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतीचा पुनर्विकास विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. सदरहु तरतुदीअंतर्गत उक्त इमारतींचा पुनर्विकासाचा प्रस्ताव म्हाडाकडे प्राप्त झालेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील नार-पार नदी जोड प्रकल्पाच्या आराखड्यात**
**नांदगाव तालुक्याचा समावेश करण्याबाबत**

**(३७) ६१११२ (०८-०५-२०२३). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील नार-पार नदी जोड प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आला असून नांदगाव तालुक्याचा समावेश करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आराखड्यात शासनाने मंजूरी दिली आहे काय,

(३) असल्यास, नांदगाव तालुक्यातील ७५ ते ८० गावातील शेती सिंचनाखाली हा प्रकल्प नांदगावसाठी वरदान ठरणार असतांनाही नांदगाव तालुक्याचा उक्त नदीजोड प्रकल्पात समावेश न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकल्पात नांदगाव तालुक्याचा समावेशन करण्याबाबत पुनर्विचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०९-२०२३) :** (१) होय.
(२) नाही.
(३) गिरणा खोरे हे तुटीचे खोरे असून त्यातील सिंचनाची तूट भरून काढणे हे प्रमुख उद्दीष्ट आहे. त्यामुळे सदर योजनेचे लाभक्षेत्र प्रस्तावित करतांना अस्तित्वातील कालव्यांतर्गत लाभक्षेत्राचे स्थिरीकरण करणे यास प्राधान्य देण्यात आलेले असून केवळ ५९२२ हे.नवीन क्षेत्र प्रस्तावित आहे.आर्थिक किफायतशीरता लक्षात घेता नवीन क्षेत्र हे अस्तित्वातील कालव्यानंतर लगेचच व गुरूत्वीय बलाने सिंचन होऊ शकेल यादृष्टीने प्रस्तावित केलेले आहे. त्यामुळे नांदगांव तालुक्याचा समावेश करण्यात आला नाही. तथापि या योजनेचा प्रकल्प अहवाल अद्याप अंतिम करण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली तालुक्यातील वसा पोर्ला उपसा सिंचन योजनेला निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३८) ६१८२३ (२७-०४-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैनगंगा नदीवर (ता. जि.गडचिरोली) येथील वसा गावाजवळ वसा पोर्ला उपसा सिंचन योजनेची मागणी मागील अनेक वर्षापासून प्रलंबित आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच तालुक्यात कोटगल गावाजवळ वैनगंगा नदीवर कोटगल ब्यारेज या मोठ्या सिंचन प्रकल्पाचे काम सुरु असून त्याकरिता १५४.०९ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोटगल ब्यारेजचे काम पूर्ण होण्याआधी वसा पोर्ला उपसा सिंचन योजनेचे काम होणे आवश्यक आहे. यामुळे तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली येवून त्याचा लाभ हजारो शेतकऱ्यांना मिळेल हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त वसा पोर्ला उपसा सिंचन योजनेला प्रशासकिय मान्यता देवून निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०९-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) नाही, सदर कोटगल बॅरेज प्रकल्पास
दि. ३१/१२/२०१८ रोजी शासनामार्फत रु. ६९६.९८ कोटीची प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.
(३) होय,
सदर योजनेमुळे ३०४५ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार असून योजनेची सिंचन क्षमता ४२५० हे. आहे.
कोटगल बॅरेज प्रकल्पाच्या प्रत्यक्ष बांधकामास माहे डिसेंबर २०१९ पासुन सुरुवात झालेली असून माहे जून २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) वसा-पोर्ला उपसा सिंचन योजनेच्या प्राथमिक व्यवहार्यता अहवालास क्षेत्रीय मुख्य अभियंता यांनी मान्यता दिली आहे. सदर योजनेचे सर्वेक्षण, अन्वेषण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक क्षेत्रीयस्तरावर तयार करणेत आले आहे. तथापि, शासन निर्णय दि. २३/११/२०१६ नुसार २००० हेक्टर वरील उपसा सिंचन योजना

शासकीय खर्चाने हाती घेण्यास मा. मुख्यमंत्री यांची मान्यता प्राप्त करणेसाठीची कार्यवाही प्रगतीत आहे. सदरील मान्यता प्राप्त झाल्यानंतर वसा पोर्ला उपसा सिंचन योजनेचे सर्वेक्षण, अन्वेषण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेच्या कामास प्रशासकीय मान्यता देणे व तद्नंतर निधी उपलब्ध करुन देणे शक्य आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिपळूण शहरातील पूरेसे (निळी व लाल) बाबत फेर सर्व्हेक्षण करण्याबाबत

**(३९) ६१९१४ (२५-०४-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण नगर परिषद व परिसरातील ग्रामपंचायत क्षेत्रातील पुरेषा (निळी रेषा व लाल रेषा) आखण्याचे काम शासनाच्या जलसंपदा विभागाकडून करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणताही ठोस सर्व्हे न करता व संयुक्तीक कारणे विचारात न घेता सदरच्या रेषाची आखणी केल्याने शहराचा व परिसरातील गावांचा सुमारे ८० टक्के भाग बाधीत झाला असून नगरपरिषदेकडून सदर पूररेषेमधील निळया व लाल रंगाच्या रेषा अंतर्गत येणाऱ्या क्षेत्रावर कोणत्याही प्रकारच्या बांधकाम परवानगीस निर्बंध लावण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प झाल्यास चिपळून शहराला धोका निर्माण झाला असल्याने जलसंपदा विभागाकडून पूररेषा (निळी व लाल) बाबत फेर सर्व्हेक्षण करुन चिपळूण शहर व लगतच्या ग्रामीण भागातील नागरीकांना न्याय मिळावा म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरीकांकडून शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जलसंपदा विभागांतर्गत महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, मेरी नाशिक या संशोधन संस्थेने लाल व निळया पूररेषा आखणीसंदर्भात त्यांच्या दि. १६.११.२०१५ च्या परिपत्राकान्वये तांत्रिक मार्गदर्शक तत्वे प्रसारित केले असून त्यानुसार राज्यात लाल व निळया पुररेषा आखणीची कामे करण्यात येत आहेत. जलसंपदा विभागाची जबाबदारी ही केवळ पूररेषा आखणी पर्यंत मर्यादित असून त्यामधील अवैध बांधकामांना निर्बंध लावणे, अतिक्रमण रोखणे/ हटविणे याबाबतची कार्यवाही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून करण्यात येत आहे.

(३) होय हे खरे आहे.

(४) दि.१५.१२.२०२१ रोजी मा.उपमुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीतील चर्चा व निर्णयानुसार वाशिष्टी नदीतील टप्पा-१ मधील उर्वरीत व टप्पा-२ मधील पूर्ण गाळ काढलेनंतर चिपळूण शहरानजीक नदीमध्ये पूर्वी सर्वेक्षण करणेत आलेल्या लाल व निळी पूररेषा वर काही परिणाम होतो किंवा कसे यासाठी फेर सर्वेक्षण करणे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नंदुरबार जिल्ह्यातील तापी नदीवरील उपसासिंचन योजनांची करण्याबाबत

**(४०) ६२०४७ (२५-०४-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील तापी नदीवरील बंद असलेल्या २२ उपसासिंचन योजनांच्या दुरुस्तीसाठी अंदाजपत्रकातील दरांमधे सुधारणा करणे व इतर बाबी समाविष्ट करुन नव्याने तांत्रिक मान्यता देण्याबाबत शासनस्तराव काय कार्यवाही करण्यात येत आहे,

(२) असल्यास, नव्याने तांत्रिक मान्यता देण्यासाठी किती कालावधी लागणे अपेक्षित असून सर्व सोपस्कर पार पाडून काम पूर्ण करण्यासाठी निवीदा काढण्यासाठी लागणारा कालावधी किती आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१) नंदुरबार जिल्हयातील तापी नदीवरील बंद असलेल्या २२ उपसा सिंचन योजनांच्या रू.११५.०५ कोटी किमतीस सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकात दि.२१.०१.२०२२ रोजी शासनाने मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार आवश्यकतेप्रमाणे बदल करून सक्षम स्तराहून तांत्रिक मान्यता देखील प्रदान केली आहे.

तांत्रिक मान्यता देण्याकरीता सक्षम अधिकारी संबंधित मुख्य अभियंता असल्याने शासन स्तराहून कोणतीही कार्यवाही अपेक्षीत नाही.

(२) सदर कामास सक्षम स्तराहून तांत्रिक मान्यता प्रदान केली असून दि.०७.०२.२०२३ ते दि.२४.०३.२०२३ या कालावधीत २२ योजनांपैकी १५ कामांच्या निविदा २ वेळा प्रसिध्द करण्यात आल्या व ६ कामांच्या निविदा १ वेळा प्रसिध्द करण्यात आली. त्यापैकी १२ योजनांना प्रतिसाद प्राप्त होवून निविदा कार्यवाहीत आहेत. उर्वरीत ८ योजनांचे तृतीय निविदा प्रसिध्दी करणे प्रगतीत आहे. विध्यांसिनी उपसा सिंचन योजनेच्या कामास दि. ०२.०५.२०२३ रोजी कार्यारंभ आदेश देऊन कामास सुरुवात करण्यात आली. केदारेश्वर उपसा सिंचन योजना, प्रकाशा संबंधित सहकारी संस्थेने या विभागास हस्तांतरीत केलेली नाही. त्यामुळे निविदा कार्यवाही करणेत आलेली नाही.

---

## नगर जिल्ह्यातील मुळा धरणाचे व्यवस्थापन व देखभाल करण्यासाठी स्वतंत्र अभियंत्याची नेमणुक करण्याबाबत

**(४१) ६२११५ (२५-०४-२०२३). श्री.शंकरराव गडाख (नेवासा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर जिल्ह्यातील मुळा धरणाचे व्यवस्थापन व देखभाल करण्यासाठी स्वतंत्र अभियंत्याची तरतुद असून अभियंत्याने धरण परिसरातच वास्तव्याला राहणे अपेक्षित असते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अभियंत्याचे पद अनेक वर्षापासून रिक्त असून सदर जागेवर दिडशे कि.मी. दूर असलेल्या नाशिकच्या मेरी या संस्थेत काम करणाऱ्या अभियंत्याकडे धरण शाखेचा अतिरिक्त भार सोपवला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ५० वर्ष जुने झालेले २६ टीएमसी चे मोठे धरण असून त्याच्या सुरक्षेसाठी शासन पूर्णवेळ अभियंता यांच्या नेमणूकीबरोबर धरणाच्या सुरक्षेसाठी त्याला मदतीला पुरेसा तांत्रिक व सुरक्षा स्टाफ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही,

माहे मार्च २०२३ अखेर मुळा पाटबंधारे विभागांतर्गत शाखाधिकारी संवर्गाची ३१ पदे मंजूर असून त्यापैकी केवळ ७ पदेच कार्यरत असून २४ पदे रिक्त असल्याने विभागांतर्गत बहुतांश शाखाधिका-यांकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. विभागांतर्गत सेवाज्येष्ठ श्री.शरद दिनकर कांबळे यांचेकडे शाखाधिकारी, मुळा धरण शाखा, मुळानगर चा कार्यभार दिनांक २८/०२/२०२२ ते २४/०४/२०२३ पर्यंत अतिरिक्त स्वरुपात सोपविण्यात आलेला होता, सद्य:स्थितीत सदर शाखेचा अतिरिक्त कार्यभार श्री.राजेंद्र जनार्दन पारखे, कनिष्ठ अभियंता, सिंचन शाखा, नेवासा क्र.१ यांचेकडे दिनांक २५.०४.२०२३ पासून सोपविण्यात आला आहे.

(३) धरण सुरक्षिततेसाठी शाखाधिकारी, मुळा धरण यांचे मदतीसाठी उपलब्ध तांत्रिक वर्ग पुरविण्यात आला असून आवश्यकतेनुसार कंत्राटीपद्धतीने कुशल व अकुशल कामगारांची नियुक्ती विभागस्तरावरुन करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदर धरणावर शाखाधिकारी मिळून वरीलप्रमाणे कुशल व अकुशल अशी एकूण २४ एवढी कर्मचारी

संख्या कार्यरत आहे. तसेच, धरणाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ पोलिसचौकी कार्यरत असून त्या ठिकाणी २४ तास पोलिसांचा पहारा असतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर येथील वेकोलीच्या इंदर कोळसा खाण क्रमांक ६ च्या चेक पोस्टजवळ झालेल्या गोळीबाराबाबत

**(४२) ६२५८४ (३०-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील वेकोलीच्या इंदर कोळसा खाण क्रमांक ६ च्या चेक पोस्टजवळ ११ डिसेंबर, २०२२ रोजी झालेल्या गोळीबारात जखमी झालेल्या महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या (एमएसएफ )जवानाचा मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मृत मिलिंद खोब्रागडे हा खासगी सुरक्षा एजन्सीमध्ये सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत होता उक्त वेकोली इंदर कोळसा खाणीवरील चेकपोस्टवर कार्यरत असताना आरोपी चेकपोस्टजवळ येऊन त्यांनी केलेल्या गोळीबारात तो मृत्युमुखी पडला हे लक्षात घेता आरोपीला फाशीची शिक्षा तसेच मृत जवानाच्या पत्नीला नोकरी द्या अशी मागणी संतप्त कुटुंबिय करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृत जवानाच्या पत्नीला नोकरीत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०२३) :**(१) होय. हे खरे आहे.
(२) व (३)
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे (एमएसएफ) सुरक्षा रक्षक मृतक मिलींद समाधान खोब्रागडे यांच्या पत्नीने त्यांना नोकरी देण्याबाबत महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडे निवेदन सादर केले असून, सदर निवेदनावर महामंडळामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे स्वायत्त असून अनुकंपा तत्वावर नोकरी देणे याबाबत महामंडळाच्या कायद्यात तरतुद नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

### कन्नड-सोयगांव विधानसभा मतदार संघात अतिवृष्टीमुळे नदीलगत असलेल्या गावांमध्ये संरक्षण भिंती बांधण्याबाबत

**(४३) ६२६२३ (२५-०४-२०२३). श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्नड-सोयगांव विधानसभा मतदार संघात अतिवृष्टीमुळे नदीलगत असलेल्या गावात पावसाच्या पुराचे पाणी घूसुन जिवित हानी होण्याची शक्यता असल्यामुळे नदीलगत असलेल्या गावांमध्ये संरक्षण भिंती बांधण्याकरिता तत्कालिन जलसंपदा मंत्री यांना दि.४.९.२०२१ पासून वारंवार स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदने दिली आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१)अंशत: खरे आहे

कन्नड-सोयगाव विधानसभा मतदार संघामधील एकूण २० ठिकाणी तसेच शिवना नदीवर दोन ठिकाणी अशा एकूण २२ ठिकाणी पूर संरक्षण भिंत बांधण्याबाबतची मागणी कन्नड-सोयगाव मतदार संघाचे विधानसभा सदस्य श्री.उदयसिंग राजपूत यांनी तत्कालीन जलसंपदा मंत्री महोदय यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे दि.०८.०८.२०२१ रोजी केली आहे.

(२) सदर पूरसंरक्षक भिंती करीता शासन निर्णय दि.३१.०८.२०१९ च्या तरतुदीनुसार प्रस्ताव बनविण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मान्यतेची आवश्यक कार्यवाही शासन स्तराहून करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी भागातील जमीन विषयक पट्टे अतिक्रमणधारकांना कायमस्वरुपी देण्याबाबत

**(४४) ६२६६० (२१-०४-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी भागातील जमीन विषयक पट्टे देण्याचे निर्देश सन १९९० च्या शासन निर्णयानुसार देण्यात आले असून त्या निर्णयाची अंमलबजावणी न आल्याने आदिवासी व गैर आदिवासी बांधवांच्या अतिक्रमण जमिनीचे पट्टे मिळालेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर सन २००५ च्या वन हक्क कायद्यानुसार आदिवासी बांधवांच्या अतिक्रमित वन जमिनींना कायमस्वरुपी पट्टे देण्यात आले मात्र गैर आदिवासी बांधवांसाठी तीन पिढ्यांची जाचक अट ठेवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे गैर आदिवासी बांधवांना अतिक्रमित वन जमिनीचे पट्टे न मिळाल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये अतिक्रमणधारक म्हणून गैर आदिवासी बांधवांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणातील सदरहू निर्णय घेऊन गैर आदिवासी बांधवांसाठी असणारी तीन पिढ्यांची जाचक अट रद्द करुन सन २००५ पूर्वीच्या सर्व अतिक्रमणधारकांना कायमस्वरुपी पट्टे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०८-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यात सन १९९० च्या शासन निर्णयानुसार आदिवासी व गैर आदिवासी बांधवांना अतिक्रमण जमिनीचे पट्टे मिळाले आहेत.

(२) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता ) अधिनियम, २००६ नुसार अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत.

उक्त अधिनियमामध्ये कलम २ (ण) अनुसार ‘‘इतर पारंपारिक वननिवासी’’ याचा अर्थ, दिनांक १३ डिसेंबर, २००५ पूर्वी किमान तीन पिढ्यांपासून मुख्यत्वेकरून वनात राहणारा आणि उपजीविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजांसाठी वनांवर किंवा वन जमनीवर अवलंबून असणारा कोणताही सदस्य किंवा समाज असा आहे’’.

पिढी याचा अर्थ पंचवीस वर्षाचा कालखंड असा आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) यासंदर्भात केंद्र शासनाने त्यांच्या दि.०९.०६.२००८ रोजीच्या पत्रान्वये स्पष्टीकरण दिलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पोशीर (जि.रायगड ) येथे उल्हास नदीवर नविन धरण बांधण्याबाबत

**(४५) ६२८३८ (२७-०४-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांगणी, बदलापूर, अंबरनाथ या परिसरात पिण्याच्या पाण्यासाठी पोशीर (ता.कर्जत.जि.रायगड) येथे उल्हास नदीवर धरण बांधण्याबाबत लोकप्रतिनिधीकडून मागणी केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार उल्हास नदीवर नवीन धरण बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

सदर धरणाच्या बुडीत व लाभक्षेत्र सर्व्हेक्षणाच्या कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत. तथापि, सदरील प्रकल्प नवीन असल्याने त्यास मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक यांच्याकडून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर विषयांकित प्रकल्पांचे पूर्व संभाव्यता अहवालास सक्षम स्तरावरून मान्यता प्राप्त करून त्यानुसार सर्वेक्षण, अन्वेषण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणेत येईल. जेणेकरून सदर कामास नगरविकास खात्याकडून प्रशासकीय मान्यता घेणे शक्य होईल" त्यानुसार क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खोपोली टाटा हायड्रो पावर येथून ओव्हर फ्लो होऊन खाडीमध्ये जाणारे पाणी नवी मुंबई महानगरपालिकेस मिळणेबाबत

**(४६) ६२९७१ (२७-०४-२०२३). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली येथील टाटा हायड्रो पॉवर येथील पाणी पावसाळयामध्ये ओव्हर फ्लो होऊन पातळगंगा नदीतून खाडीमध्ये वाहून जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाटा हायड्रो पॉवर येथून खाडीमध्ये जाणारे पाणी नवी मुंबई महानगरपालिकेस देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री महोदयांना लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदरचे वाया जाणारे पाणी नवी मुंबई महानगरपालिकेस देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०९-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे.

टाटा पॉवर कंपनीने वीजनिर्मितीकरीता पुणे जिल्ह्यात वळवण, शिरवठा व लोणावळा या ठिकाणी पुर्ववाहिनी नदीवर धरणे बांधलेली असून विद्युत निर्मिती करीता या जलाशयांतील पाणी पश्चिमेकडे खोपोली येथे बोगदा व दाबनलिकेद्वारे वीजनिर्मिती केंद्राकडे सोडले जाते.

टाटा पॉवर कंपनीचे पुणे जिल्ह्यातील पुर्ववाहिनी नदीवर बांधलेली धरणे पावसाळयाध्ये ओव्हर फ्लो झाल्यास ते पाणी पुर्वेकडे इंद्रायणी नदीमध्ये पुणे जिल्ह्यात (पुर्वेकडे) जाते. त्यामुळे धरणातील ओव्हर फ्लो चे पाणी पाताळगंगा नदीतून खाडीमध्ये वाहून जात नाही.

परंतु पावसाळा कालावधीत खोपोली येथील वीजकेंद्रातून विद्युतनिर्मितीनंतर पाताळगंगा नदीत सोडण्यात येणारे पाणी व पाताळगंगा नदीच्या मुक्त पाणलोट क्षेत्रातून उपलब्ध होणारे पाणी यामधून सिंचन व बिगरसिंचन पाणीवापर वगळता उर्वरित पाणी समुद्रास मिळते .

(२) निवेदन जलसंपदा विभागास अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुक्ताईनगर ( जि. जळगांव ) या तालुक्यातील स्वातंत्र्यपूर्व काळापासून वसलेली गावे १०० टक्के आदिवासी असतांनाही आदिवासी बाहय गावे नोंद करण्यात आल्याबाबत**

**(४७) ६८२२९ (०३-०९-२०२३). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर ( जि. जळगांव ) या तालुक्यातील मधापुरी, राजूरा पावरीवाडा, जोंधनखेडा, लालगोटा, हलखेडा, धुळे पावरीवाडा ही गावे स्वातंत्र्यपूर्व काळापासून वसलेली असून शासकीय अभिलेखातील चुकीमुळे किंवा तांत्रिक अडचणीमुळे सदर गावे १०० टक्के आदिवासी असतांनाही आदिवासी बाहय गावे नोंद करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांना आदिवासीच्या विविध योजनांचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गावांचा समावेश आदिवासी गावे म्हणून नोंद करण्याची मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी आदिवासी विकास विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने बाहय गावे नोंद असलेली गावे आदिवासी गावे म्हणून घोषित करुन त्यांना आदिवासींच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०९-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही

(२) हे खरे नाही.

(३) होय, या संदर्भात मा.लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे दि.१२.०७.२०२१ रोजीच्या निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

(४) मा.राष्ट्रपती महोदय यांच्याद्वारा राज्याच्या अनुसूचित क्षेत्राबाबत दि.०२.१२.१९८५ रोजी अधिसूचना काढण्यात आलेली आहे. सदर अधिसूचना काढून ३७ वर्षाचा कालावधी झालेला आहे. राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुर्नरचनेच्या प्रस्तावासंदर्भात कार्यवाही सुरू आहे. यासंदर्भात मा.मंत्री, आदिवासी विकास यांचेकडे दि.१०.०५.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुर्नरचनेचा प्रस्ताव आगामी जनजाति सल्लागार समितीच्या बैठकीत ठेवण्याच्या सूचना आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पूणे यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यात महादेव कोळी समाजाला जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत असल्याबाबत**

**(४८) ६८३११ (०३-०९-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात महादेव कोळी समाजाने जात प्रमाणपत्र मिळण्यास अडवणूक होत असल्याने दि. १० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जात प्रमाणपत्र तातडीने मिळण्यासाठी लाच दिली जात असून, जे नागरीक लाच देऊ शकत नाहीत त्याच्या अर्जात त्रुटी काढून त्यांना जात प्रमाणपत्र दिले जात नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्या नागरिकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन जात पडताळणी धोरण आणण्याबाबत मा. उपमुख्यमंत्री यांनी दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी आश्वासित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आश्वासित केलेल्या धोरणाची अंमलबजावणी करुन आंदोलनकर्त्या नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (२७-०९-२०२३) :** (१) व (२) श्री. परमेश्वर गोणारे यांनी महादेव कोळी जमातीला जात प्रमाणपत्र देण्यासाठी दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी आंदोलन केले होते.
(३) हे खरे आहे.
(४) नांदेड जिल्हयात महादेव कोळी अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्रासाठी दाखल केलेल्या अर्जासोबत जोडण्यात आलेले कागदपत्रे, अभिलेखे व पुरावे याची पडताळणी व तपासणी करुन राज्यात "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागावसर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० व सदर अधिनियम अंतर्गत पारीत महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २००३", दिनांक ०४.०६.२००३ मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची व त्याच्या पडताळणीची कार्यवाही करण्यात येते. सदर अधिनियमातील तरतुदी या सर्व अनुसूचित जमातींना लागू असून त्यानुसार जात प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते. उक्त अधिनियम व नियमांत सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण येथे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहाची इमारत मंजूर करण्याबाबत

**(४९) ७०९२१ (०३-०९-२०२३). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विद्यार्थ्यांकरिता कल्याण येथे भाड्याच्या अपुऱ्या व सोयी सुविधा नसलेल्या इमारतीत वसतीगृह सुरु असल्याचे दि.१ जून,२०२३ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास ,सोयी सुविधांचा अभाव असल्याने त्याचा परिणाम सदर वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबींवर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन झाले, त्याअनुषंगाने कल्याण (प.) येथे आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतीगृहासाठी सर्व सोयी सुविधा असणारी स्वतंत्र व स्वमालकीची इमारत मंजूर करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०८-०९-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रस्तुत वसतिगृह मौजे चिकनघर ता.कल्याण जि.ठाणे येथील म्हाडा वसाहतीतील इमारत क्र.८८ व ८९ या शासकीय जागेत सुरु होते. तथापि, या इमारती जीर्ण झाल्याने म्हाडा वसाहतीतील इमारतीचे पुर्नविकास होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात वसतिगृह सर्व सोयी-सुविधा असलेल्या भाड्याच्या इमारतीत सुरु करण्यात आले आहे.
विभागाकडे उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार शासकीय जागेत वसतिगृह इमारतीचे बांधकाम घेण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास विभाग अधिनस्थ अमरावती येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीमधून ‘जात वैधता प्रमाणपत्रांच्या नस्ती गहाळ झाल्याबाबत**

**(५०) ७०९७२ (०३-०९-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभाग अधिनस्थ अमरावती येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीमधून ‘जात वैधता प्रमाणपत्राच्या तब्बल ३५ नस्ती गहाळ झाल्या असल्याचे दि. २८ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने संबधित दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (२७-०९-२०२३) :** (१) व २) मा. उच्च न्यायालय, खंडपिठ नागपूर, येथे याचिका क्रमांक १४१/२०२२ मध्ये दिनांक १४.६.२०२३ रोजी सुनावणीच्या वेळेस सहायक शासकीय अभियोक्ता यांनी विचारणा केली असता सदर प्रकरणाची नस्ती आढळून येत नसल्याचे विधी अधिकारी यांनी सांगितले व सोबतच कार्यालयातील नस्तींच्या स्कॅनिंगचे काम खाजगी संस्थेला दिलेले असल्यामुळे त्या कामामध्ये कार्यालयातील ३२ ते ३५ प्रकरणांच्या नस्त्या या आढळून येत नसल्याबाबत मा. उच्च न्यायालयात वक्तव्य केले होते.

त्यामुळे, मा. उच्च न्यायालयाने चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार चौकशी करण्यात आली असता सदर नस्त्या या गहाळ झालेल्या नसल्याचे आढळून आले आहे. सर्व नस्त्या या कार्यालयातच आढळून आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.